रविवार, २१ ऑगस्ट २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३५
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड


अंतरंग


गणेशोत्सवापूर्वी होणार प्राथमिक शिक्षकांचे पगार/५

नवी मुंबईत स्वाईन फ्ल्यू टेस्टींगला सुरुवात/६

वनडे मालिकेत भारताची विजयी आघाडी/८


## ताम्हिणी घाटात कार दरीत कोसळून तिघांचा मृत्यू



**माणगाव** : पुणे रस्त्यावरील ताम्हिणी घाटात कारला भीषण अपघात होऊन कार २०० फूट खाली दरीत कोसळली. या अपघातात कारमधील तीन जण जागीच ठार झाले असून तिघे गंभीर जखमी झाले. हा अपघात शनिवारी (दि. २०) सायंकाळी ५:३० वाजण्याच्या सुमारास घडला. अकोला जिल्ह्यातील वाशीम येथून आलेल्या स्विफ्ट कारमध्ये एकूण सहा प्रवासी होते. ताम्हिणी घाटात आले असताना वळणावर त्यांची कार कठडा तोडून २०० फूट खाली दरीत कोसळली. या अपघाताची माहिती समजताच, माणगाव पोलिसांसह साळुंखे रेस्क्यू टिम तातडीने घटनास्थळी दाखल झाली. अपघातात कारचा चुराडा झाला. कारमधील ऋषभ चव्हाण, सौरभ भिंगे, क्रिष्णा राठोड यांचा जागीच मृत्यू झाला, तर रोहन गाडे, प्रवीण सरकटे, रोशन चव्हाण हे जखमी झाले.

# मुंबई तोडण्याची कुणाचीही हिंमत नाही -देवेंद्र फडणवीस

## भाजप कार्यकर्ता मेळाव्यात मविआवर चौफेर टीका



**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडीचे सरकार कोसळल्यानंतर राज्यात एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार स्थापन झाले. त्यानंतर आता मुंबई महानगरपालिकेवर युतीचा भगवा फडकवण्याचा दावा भाजपकडून केला जात आहे. त्या अनुषंगाने मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहात शनिवारी (दि. २०) भाजप कार्यकर्त्यांचा मेळावा झाला. या मेळाव्यात बोलताना पक्षाच्या नेतेमंडळींनी महाविकास आघाडीवर टीका करताना पालिका निवडणुकांचे रणशिंग फुंकले.

जस-जशी निवडणूक जवळ येईल, तसा भावनिक आवाहनाला वेग येईल. मुंबई महाराष्ट्रातून तोडण्याचा डाव, अशी विधाने येतील, मात्र विरोधकांना हे समजत नाही

> **मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प ४५ हजार कोटींचा आहे. देशातील अनेक राज्यांपेक्षा मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प मोठा आहे. महापालिका एवढी श्रीमंत असताना मुंबईकरांसाठी शिवसेनेने काय केले? त्यांना कोणत्या सुविधा दिल्या? शिवसेनेने मुंबईला केवळ भ्रष्टाचार दिला. त्यातून मुंबईकरांना बाहेर काढायचे आहे.**
> **-आशिष शेलार, मुंबई अध्यक्ष, भाजप**

की, मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याची हिंमत कोणीच करू शकत नाही, असा इशाराच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

या मेळाव्याला भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, भाजप नेते अतुल भातखळकर, प्रवीण दरेकर यांच्यासह इतर नेते कार्यक्रमाला उपस्थित होते.

फडणवीस पुढे म्हणाले की, जगाला हेवा वाटावा असे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे नेतृत्व आपल्याकडे आहे. मी त्यात काय योगदान देऊ शकतो, याचा प्रत्येकाने विचार करण्याची गरज आहे. मुंबई आणि महाराष्ट्राच्या हितासाठी जितके वेळा दिल्लीला जावे लागेल, मी आणि मुख्यमंत्री आम्ही जाऊ. तुमच्यासारखे सोनिया गांधींसमोर समोर झुकणार नाही, असा टोलाही त्यांनी या वेळी उद्धव ठाकरे यांना लगावला. भ्रष्टाचाराच्या विळख्यातून मुंबई महापालिकेला बाहेर काढावेच लागेल. सामान्य मुंबईकरांना त्यांना त्यांचा हक्क देणारे प्रशासन मुंबई महापालिकेत द्यावे लागेल. त्यासाठी आम्ही सर्वतोपरी लढू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमात टोल, रस्ते, खड्डे आणि विकासकामांवरून शेलारांनी शिवसेनेवर टीका केली. देवेंद्र फडणवीसांच्या आधी आशिष शेलार यांचे भाषण झाले. या वेळी शेलार यांनी देवेंद्र फडणवीसांना थेट अमिताभ बच्चन यांची उपमा दिली. देवेंद्र फडणवीसांनीदेखील याच डायलॉगबाजीची री ओढत स्वत:देखील शोले चित्रपटातील डायलॉग बोलून दाखवताच उपस्थितांमध्ये हास्याची लकेर उमटली. मघाशी माझा उल्लेख झाला. हे मला अमिताभ बच्चन म्हणतात. **(पान २ वर...)**

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रस्ता विकासकामाचे भूमिपूजन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण फाटा ते गव्हाणच्या दिशेने जाणारा रस्ता सिडकोने विमानतळ बाधितांच्या पुनर्विकासाकरीता उलवे नोड पॅकेज-३ विकसित करताना उद्ध्वस्त केला होता. गव्हाण, शेलघर, न्हावा, न्हावाखाडी, कोपर, शिवाजीनगर या गावातील नागरिकांचा रहदारीचा हा रस्ता बंद झाल्याने गैरसोय होत होती. या संदर्भात माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिडकोकडे पाठपुरावा केला असून अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. त्यानुसार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या रस्त्याचे शनिवारी (दि. २०) भूमिपूजन झाले. या वेळी त्यांनी पनवेल, उरण, नवी मुंबई या ठिकाणी जाण्याकरीता हा रस्ता महत्त्वाचा असून लवकरच या रस्त्याचे काम होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. **(पान २ वर...)**

## दिल्लीचे उपमुख्यमंत्री सिसोदियांविरोधात एफआयआर दाखल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**


उत्पादन शुल्क धोरणातील कथित अनियमिततेच्या संदर्भात सीबीआयने दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या घरासहित २१ ठिकाणी छापेमारी केली आहे. दिल्लीतील मद्य धोरण घोटाळ्याविरोधात सीबीआयने मनीष सिसोदियांसोबत १५ आरोपींविरोधात एफआयआर दाखल केला आहे. यामध्ये सिसोदियांना घोटाळ्यातील मुख्य आरोपी सांगण्यात आले आहे. त्यामुळे सिसोदियांना लवकरच अटक केली जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## मुंबईला बॉम्बने उडवण्याची धमकी; हाय अलर्ट जारी

### सहा दहशतवादी भारतात पोहचल्याचा संदेश

**मुंबई : प्रतिनिधी**

२६/११ सारखा दहशतवादी हल्ला करण्याची धमकी मुंबई ट्रॅफिक पोलिसांना देण्यात आली आहे. ट्रॅफिक पोलिसांच्या कंट्रोल रुममधील व्हॉट्सअ‍ॅप नंबरवर धमकीचा संदेश आला आहे. या मेसेजमध्ये सहा दहशतवादी भारतात पोहचल्याचा दावा केला आहे. या संदेशानंतर एकच खळबळ उडाली असून मुंबई पोलिसांनी हाय अलर्ट जारी केला आहे.



याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून या तपास सुरू असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. हे प्रकरण गंभीर असून मुंबईत पुन्हा २६/११ घडवण्याची धमकी देण्याऱ्या नंबरचा तपास सुरू आहे. हे मेसेज कुणी आणि कसे पाठवले याची चौकशी सुरू आहे. यानंतर सर्व तपास यंत्रणा सतर्क झाल्या आहेत, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशांनुसार याप्रकरणाचा तपास वेगाने सुरू करण्यात आला. मुंबईला धमकी देणारा फोन लाहोरचा असून त्याचे नाव इम्तियाज आहे. इम्तियाजने दावा केला आहे की, तो सरकारी विभागात काम करतो आणि व्यवसायाने माळी आहे, अशी माहिती मुंबई पोलिसांनी दिली.

## निवडक

### गोंदीयामध्ये स्कूल बस ३० फूट खोल कोसळली

**गोंदिया** : विद्यार्थ्यांना विवेक मंदिर शाळेत सोडणारी बस गोंदिया येथील रिंग रोड जोडमार्गावरील पूल उतरताना ३० फूट खोल कोसळली. अपघातात जखमी झालेल्या चालकाला उपचाराकरिता रुग्णालयात हलविण्यात आले आहे. ही बस १३ मुलांना शाळेत सोडल्यानंतर रिंग रोड बायपासचा पूल उतरताना बसचे स्टेअरिंग लॉक झाल्याने अपघात झाला.

### महाराष्ट्र व पंजाब एटीएसकडून दहशतवाद्याला शिर्डीतून अटक

**शिर्डी** : महाराष्ट्र दहशतवादीविरोधी पथक आणि पंजाब दहशतवादी विरोधी पथकाने (एटीएस) संयुक्त कारवाई करीत राजिंदर या दहशतवाद्याला शिर्डीत अटक केली. १६ ऑगस्टला पंजाबमध्ये पोलीस दलातील पोलीस निरीक्षकाच्या गाडीला आयईडी लावून ती उडवण्याचा कट त्याने आखल्याचा आरोप त्याच्यावर आहे. पंजाब आणि महाराष्ट्र एटीएसने एकत्र कारवाई करीत राजिंदरला अटक केली.

## राज्यात १२ नवीन वैद्यकीय महाविद्यालये



**मुंबई : प्रतिनिधी**

### वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांची मोठी घोषणा

राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये नवीन वैद्यकीय महाविद्यालये उभारण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीष महाजन यांनी घेतला आहे.

राज्यातील १२ जिल्ह्यांत वैद्यकीय महाविद्यालये नाहीत. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण विभागासंदर्भात बैठक बोलावली होती. या बैठकीत राज्यातील १२ जिल्ह्यांमध्ये नवीन वैद्यकीय महाविद्यालये उभा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही महाविद्यालये उभारण्यासाठी एशियन डेव्हलपमेंटकडून चार हजार कोटींचे कर्ज दिले जात आहे. या कामांना लवकरच सुरुवात होईल. केंद्र सरकारकडूनही निधी लवकरच उपलब्ध करून दिला जाईल, असे आश्वासन गिरीष महाजन यांनी बोलताना दिले.

आमची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक झाली. सर्वांनी एकमताने हा निर्णय घेतला आहे. मागील पाच वर्षांत एकाही मेडिकल कॉलेजला परवानगी दिली नाही, परंतु आता बैठकीत साहसी खेळाचा निर्णय घेतला. खासगीपेक्षा सरकारी मेडिकल कॉलेजचा नागरिकांना फायदा होईल, असे महाजन यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. महाराष्ट्रात गडचिरोली, वाशिम, हिंगोली, बुलडाणा, भंडारा, पालघर, ठाणे, अहमदनगर, अमरावती, जालना, मुंबई उपनगर आणि वर्धा जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालये उभारण्यात येणार आहेत, असेही महाजन म्हणाले.

## गद्दार म्हणणाऱ्यांना धडा शिकवू

### आदित्य ठाकरे यांच्या सभेनंतर आमदार भरत गोगावले यांचा इशारा



**महाड : प्रतिनिधी**

आम्ही गद्दारी केलेली नाही, आम्ही शिवसेना सोडलेली नाही, आम्ही हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी आजही कायम आहोत, असे असताना आम्हाला गद्दार म्हणणाऱ्यांना येत्या निवडणुकांमध्ये धडा शिकवू, असा इशारा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे प्रतोद आमदार भरत गोगावले यांनी केला. आदित्य ठाकरे यांच्या नुकत्याच झालेल्या सभेनंतर आमदार गोगावले यांनी शनिवारी (दि. २०) पत्रकार परिषद घेत आदित्य ठाकरे आणि माजी मंत्री अनंत गीते यांना सूचक इशारा दिला.

महाडमध्ये युवा सेनेचे अधिकारी आदित्य ठाकरे यांच्या सभेमध्ये आमदार भरत गोगावले यांच्यासह शिंदे गटावर जोरदार टीका केली. शिवसेना सोडून गेलेल्यांचा गद्दार असा उल्लेख करीत भविष्यात या आमदारांना विधानसभेची पायरी चढू दिली जाणार नाही, असा इशारा दिला होता. यामुळे या टीकेला प्रत्युत्तर देण्यासाठी आमदार भरत गोगावले यांनी पत्रकार परिषद घेऊन पलटवार केला.

शिवसेनेतून ४० आमदार आणि १२ खासदार बाहेर पडले, मात्र आम्ही कोणत्याही पक्षात गेलेलो नाही अथवा अन्य पक्ष स्थापन केलेला नाही. त्यामुळे आम्ही गद्दार कसे हे दाखवून द्यावे. आम्ही हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी प्रामाणिक असून आम्हाला तत्त्व पटली नाहीत म्हणून हा निर्णय घेतला. मूळ शिवसैनिकदेखील आमच्याबरोबर असल्याचा दावा भरत गोगावले यांनी केला. गद्दार म्हणणाऱ्यांना येणाऱ्या काळात धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, असा सूचक इशारादेखील सभेला उपस्थित असलेल्या पदाधिकाऱ्यांना दिला. या वेळी त्यांनी अनंत गीते यांच्याशी प्रामाणिक राहिल्यानेच ते कायम निवडून आल्याचे सांगितले. त्यामुळे ते आम्हाला काय धडा शिकवण्याची भाषा करतात. यापुढे कसे निवडून येता तेदेखील आम्ही पाहतो, असा इशारा देखील गीते यांना दिला.

सरकार स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वसामान्य माणसाला जे हवे आहे, त्या प्रकारचे निर्णय घेऊन न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. **(पान २ वर...)**

## इंग्लंडविरुद्धच्या वनडे मालिकेनंतर झुलन होणार निवृत्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

झुलन गोस्वामीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला आहे. भारताची अनुभवी वेगवान गोलंदाज इंग्लंडविरूद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेणार आहे. याबाबतचे वृत्त एनडीटीव्हीने दिले आहे.



इंग्लंड दौऱ्यासाठी नुकताच भारतीय महिला संघ घोषित झाला. या संघात भारताची अनुभवी वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामी हिचादेखील समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे झुलनला महिला वनडे वर्ल्डकपनंतर विश्रांती देण्यात आली होती. ती वर्ल्डकपमधील श्रीलंकेविरूद्धचा सामना देखील खेळली नव्हती. दरम्यान, आता ती इंग्लंड दौऱ्यावर २४ सप्टेंबरला लॉर्ड्सवर होणाऱ्या तिसऱ्या आणि शेवटच्या सामन्यानंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेणार असल्याचे वृत्त एनडीटीव्हीने दिले आहे.

झुलन गोस्वामी महिला क्रिकेटमध्ये सर्व क्रिकेट फॉरमॅटमध्ये मिळून सर्वाधिक विकेट घेतल्या आहेत. तिच्या नावावर सध्या ३५२ विकेट्स आहेत.

## कर्जत तालुक्यात शेकापमध्ये नाराजीसत्र

### उमरोलीपाठोपाठ सावेळे गटाच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली खंत




**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुक्यातील शेतकरी कामगार पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांची नाराजी आता उघड होऊ लागली आहे. पक्षनेतृत्व लक्ष देत नाही आणि कार्यकर्ते वाऱ्यावर असून गावोगावी विकास करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा निधी मिळत नसल्याने तालुक्यातील उमरोलीपाठोपाठ सावेळे गटातील कार्यकर्त्यांनीही सामूहिकपणे नाराजी व्यक्त केली आहे. यापूर्वी उमरोली जिल्हा परिषद गटातील कार्यकर्त्यांनी सामुहिक राजीनामे दिले आहेत.

शेकापला दोन वर्षानंतर कर्जत तालुका चिटणीसपदी श्रीराम राणे यांनी धुरा हातात घेतल्यानंतर पुन्हा एकदा पक्ष पुन्हा सक्रिय होण्यासाठी पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचा प्रयत्न सुरू केला आणि त्यामुळे नाराजीचे सुरू उमटू लागले आहेत. उमरोली गटातील शेकाप कार्यकर्त्यांनी आपल्या पदाचे सामुहिक राजीनामे जिल्हा चिटणीस यांना पाठवून नाराजी व्यक्त केली होती. त्यांनतर सावेळे जिल्हा परिषद गटाच्या कार्यकर्त्यांनीही बैठक घेऊन आपल्या विभगात, गेली १० वर्षे याच समस्या कायम असून विकासकांसाठी निधी मिळत नाही, कार्यकर्त्यांच्या समस्या ऐकून घेतल्या जात नाहीत, तसेच तालुक्यात पक्षाचे निर्णय घेताना पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मते जाणून घेतली जात नाहीत असा आरोप कार्यकर्ते करीत आहेत.

सावेळे जि. प. गटातील शेकाप कार्यकर्त्यांनी नाराजीचे पत्र रायगड जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्र हजारे यांच्याकडे दिले आहे. सावेळे गटातील विभाग चिटणीस शिवाजी भगत, ज्येष्ठ कार्यकर्ते नंदा पाटील, कृउबासचे माजी उपसभापती विठ्ठल भुंडेरे, मधूकर पाटील, माजी विभाग चिटणीस विलास भागीत, कृउबास संचालक अनंता दळवी, संतोष वैखरे, पं. स. गणाचे चिटणीस महेश कोळंबे, माजी उपसरपंच रामचंद्र भोईर, दिलीप शेळके, गणेश मसने, प्रसाद म्हात्रे, अनता बागडे आदींनी पक्षाला नाराजी कळविली आहे.

# आदित्य ठाकरे हिटलरप्रमाणे वागताहेत

## ■ शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे हे हिटलरप्रमाणे वागत असल्याची टिका शिंदे गटाचे प्रवक्ते तथा मंत्री दीपक केसरकर यांनी केली आहे.

शिवसेना पक्षात बंडखोरी झाल्यानंतर शिवसेना नेते आदित्य ठाकरे हे पक्षबांधणीसाठी महाराष्ट्र दौरा करत आहेत. शिवसंवाद यात्रेच्या माध्यमातून ते महाराष्ट्रातील विविध मतदारसंघात जाऊन शिवसेना कार्यकर्ते आणि जनतेची भेट घेत आहे. या दरम्यान ते शिंदे समर्थक आमदार आणि



एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका करत आहे. या आमदारांचा उल्लेख ते सातत्याने 'गद्दार' असा करत आहेत. याच मुद्द्यावरून शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी आदित्य ठाकरेंवर टिकास्त्र सोडले आहे. दुसऱ्या महायुद्धात हिटलरने जे काही केले ते आदित्य ठाकरे सध्या महाराष्ट्रात करत आहेत, अशी टीका केसरकरांनी केली आहे. ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

आदित्य ठाकरेंवर टीका करताना ते म्हणाले की, जर्मनीचा हुकूमशहा हिटलरने जेव्हा संपूर्ण जगाला महायुद्धाच्या दरीत ढकलले होते, तेव्हा त्यांच्यासोबत गोबेल्स होते. हिटलरच्या सत्तेत गोबेल्स हे मंत्रीही होते. गोबेल्सची एक नीती होती, शंभर वेळा एक खोटे बोला, लोकांना ते खरे वाटायला लागते. आज तेच काम महाराष्ट्रात आदित्य ठाकरे करत आहेत.

आदित्य ठाकरे महाराष्ट्रात विविध ठिकाणी जाऊन लोकांमध्ये खोटी माहिती पसरवण्याचे काम करत आहेत. मी यापूर्वीही सांगितले होते की, आदित्य ठाकरे हे बाळासाहेब ठाकरे यांचे नातू असल्यामुळे मी त्यांचा आदर करतो. पण ते गोबेल्सच्या रस्त्यावर गेले तर ते आम्ही कधीही सहन करणार नाही. ही भूमी गोबेल्सच्या नीतींना मान्यता देणारी भूमी नाही, ही भूमी छत्रपती शिवाजी महाराजांची भूमी आहे, असेही दीपक केसरकर या वेळी म्हणाले.

**मुंबई महापालिकेवर १५० पेक्षा अधिक जागा मिळवू**

**शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीबाबतही भाष्य केले आहे. भाजप आणि शिवसेना मिळून येत्या निवडणुकीत १५० पेक्षा अधिक जागा मिळवून दाखवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, भाजपबरोबर आमची आता कायमची युती राहणार असल्याचेही केसरकर म्हणाले.**

## औरंगाबादचे जिल्हाप्रमुख नरेंद्र त्रिवेदींचा शिवसेनेला जय महाराष्ट्र

**औरंगाबाद : प्रतिनिधी**

शिवसेना जिल्हाप्रमुख नरेंद्र त्रिवेदी, फुलंब्री तालुकाप्रमुख राजेंद्र ठोंबरे, कृउबा सभापती चंद्रकांत जाधव यांनी नुकताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात प्रवेश केला.

जिल्हाप्रमुख पद पूर्ण क्षमतेने मिळाले नाही. पक्षात सगळे काही आ. अंबादास दानवे यांनाच दिले जात आहे. अजून किती दिवस अन्याय सहन करायचा, असा सवाल करत त्रिवेदी यांनी शिवसेना सोडल्याचे कारण बोलताना सांगितले. ठोंबरे, जाधव हे देखील शिंदे गटात सामील झाल्याचे त्यांनी सांगितले.

गेल्या आठवड्यात त्रिवेदी मुख्यमंत्री शिंदे यांना भेटले होते. त्यावेळी त्यांनी एका कामानिमित्त भेटल्याचे सांगितले होते, परंतु त्याच दिवशी त्यांनी शिंदे गटात जाण्याचे नक्की केले होते, हे स्पष्ट केले. या वेळी रोहयो मंत्री संदीपपान भुमरे, आ. संजय शिरसाट, माजी मंत्री अर्जुन खोतकर आदींची उपस्थिती होती. त्रिवेदी यांच्याकडे पैठण, फुलंब्री, सिल्लोड या मतदारसंघात संघटन करण्याची जबाबदारी होती. यापैकी सिल्लोड व पैठण मतदारसंघातील कृषीमंत्री अब्दुल सत्तार, मंत्री भुमरे हे शिंदे गटात सहभागी झाले आहेत. शहरातील दहा वॉर्ड त्रिवेदी यांच्या मतदारसंघात आहेत. त्यांचे शिंदे गटात जाण्याने शिवसेनेचे मोठे नुकसान होणार आहे.



## योग्य नियोजनामुळे यंदा पुराचा धोका टळला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

या वर्षीच्या पावसाळयात पश्चिम महाराष्ट्रातील नद्यांना दोन वेळा पूर आला. कोल्हापुरातील पंचगंगा नदीने इशारा पातळी ओलांडून धोका पातळी गाठण्याची धाव सुरू ठेवली. महापुराचा धोका दोन्ही वेळी टळला. महाराष्ट्र-कर्नाटक राज्यातील जलसंपदा विभागाने जल व्यवस्थापनात समन्वय ठेवल्याने अधिक धोका झाला नाही, असेही यंदाचे निरीक्षण आहे. पश्चिम महाराष्ट्र सातत्याने महापुरात लोटला जात आहे. २००५ आणि पुढच्याच वर्षी तसेच २०१९ आणि गतवर्षी अशा चार वेळा प्रलयकारी महापुराचा फटका कोल्हापूर, सांगली जिल्ह्यातील कृष्णा, पंचगंगा, वारणा या प्रमुख नदीकाठच्या भागाला बसला होता.

महापूर येण्यास बदललेले पाऊसमान हे जसे कारणीभूत आहे तसाच त्याचा एक धागा कर्नाटकातील अलमट्टी धरणाशी जोडला जातो. महापूर येण्यासाठी अलमट्टी धरण कारणीभूत आहे का, यावर सातत्याने चर्चा घडत आल्या आहेत. उत्तर कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यात धरणाची भिंत असलेल्या अलमट्टी धरणाचा जलसाठा बागलकोट जिल्ह्यात पसरलेला असतो. सन २००५मध्ये बांधकाम पूर्ण झालेल्या या धरणाची उंची ५१९ मीटरपर्यंत भरल्यास जलसाठा १२३ टीएमसी होतो. अलीकडे कर्नाटक सरकारने ५२४ मीटरपर्यंत उंची वाढवून २०० टीएमसी पाणीसाठा करण्याचे नियोजन चालविले आहे. दरम्यान पश्चिम महाराष्ट्राचा दौरा केल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पूरस्थितीवर कायम स्वरुपी तोडगा काढण्याचे सूतोवाच दिले आहेत. नव्या शासनाकडून गांभीर्याने दीर्घकालीन आणि शाश्वत उपाययोजना करण्याची गरज पूर्ण होईल अशी आशा नागरिकांना आहे.

## खंडणीसाठी डॉक्टरचे अपहरण; आरोपी अटक

**शिरूर : प्रतिनिधी**

तीन लाखांच्या खंडणीसाठी शिरूर तालुक्यातील डॉक्टरचे अपहरण करणाऱ्या सराईताला गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने अटक केली. आरोपी गेल्या सहा महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देत होता. वारजे माळवाडी परिसरात सापळा लावून त्याला ताब्यात घेण्यात आले.

गौरव सुरेश बिरूंगीकर (२५, रा. रामनगर, वारजे माळवाडी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. बिरूंगीकर आणि त्याच्या साथीदारांनी तीन लाख रुपयांची खंडणी शिरुर परिसरातील एका डॉक्टरकडे मागितली होती. त्यांनी डॉक्टरचे अपहरण केले होते. या प्रकरणी शिरुर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी दोघांना अटक केली होती. बिरुंगीकर आणि साथीदारांचा शोध घेण्यात येत होता. गेले सहा महिने बिरूंगीकर पोलिसांना गुंगारा देत होता. तो वारजे परिसरात येणार असल्याची माहिती खंडणी विरोधी पथकाला मिळाली. त्यानंतर सापळा लावून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने खंडणीसाठी डॉक्टरचे अपहरण केल्याची कबुली दिली. त्याला शिरुर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. अतिरिक्त पोलीस आयुक्त रामनाथ पोकळे, उपायुक्त श्रीनिवास घाटगे, सहायक आयुक्त गजानन टोम्पे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अजय वाघमारे, उपनिरीक्षक विकास जाधव, नितीन कांबळे, किरण ठवरे, अमोल आवाड, दुर्योधन गुरव आदींनी ही कारवाई केली.

## पुण्यात दोन अपघातात तिघांचा मृत्यू

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे येथे दोन वेगवेगळ्या अपघातात एकूण तिघांचा मृत्यू झाला आहे. एका घटनेत विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसच्या धडकेने दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना कोंढव्यातील एनआयबीएम रस्त्यावर घडली. या प्रकरणी बसचालकास पोलिसांनी अटक केली. तर दुसऱ्या घटनेत ट्रकने दोन शाळकरी मुलींना धडक दिली आहे. यामध्ये या दोन्ही मुलींचे निधन झाले.

पहिल्या घटनेत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शौकिन रियाज शेख (२६, रा. हडपसर) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. अपघातात दुचाकीवरील दोन सहप्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. या प्रकरणी विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसचा चालक पांडुरंग अप्पा बडदे (३७, रा. कोडीत, जि. पुणे) याला अटक करण्यात आली आहे. दुचाकीस्वार शौकिन शेख आणि त्याचे मित्र एनआयबीएम रस्त्याने जात होते. त्या वेळी दोराबजी मॉलसमोर विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसने दुचाकीला धडक दिली. अपघातात दुचाकीस्वार शौकिनच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. दुचाकीवरील दोन मित्रांना किरकोळ दुखापत झाली. गंभीर जखमी झालेल्या शौकिनचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघातानंतर पोलिसांनी बसचालक बडदेला ताब्यात घेतले.

दुसऱ्या घटनेत भरधाव ट्रकच्या धडकेने दोन शाळकरी मुलींचा मृत्यू झाल्याची घटना पुणे-सोलापूर रस्त्यावर लोणी काळभोर परिसरात शनिवारी घडली. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या दोघी सख्या बहिणी आहेत. शाळेत जात असताना सख्या बहिणींचा मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर लोणी काळभोर परिसरात शोककळा पसरली. या प्रकरणी ट्रकचालकाला पोलिसांनी अटक केली. छकुली शितोळे (१७), राजश्री शितोळे (१०, दोघी रा. कवडीपाट, कदमवाक वस्ती, लोणी काळभोर, सोलापूर रस्ता) अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. या प्रकरणी ट्रकचालक परशुराम सुकेशवार महतो (वय २६, रा. बिहार) याला अटक करण्यात आली. छकुली अकरावीत तर तिची लहान बहीण राजश्री सहावीत शिकत होती. सकाळी सातच्या सुमारास त्या शाळेत जात होत्या. त्या वेळी लोणी रेल्वे स्थानक चौकात ट्रकने दुचाकीला धडक दिली. यात दोघींचा मृत्यू झाला.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **१) अक्षय काना भगत २) अस्मिता काना भगत ३) चेतन काना भगत ४) झुलु अर्जुन पाटील ५) नंदुबाई निर्दोष पाटील ६) सुजाता सचिन पाटील ७) सुनिता गणेश पाटील ८) शुभांगी काना भगत ९) माळी विठ्ठल पोपेटा** सर्व रा. रिटघर, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - रिटघर, ता. पनवेल, जि.रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १५५ | ० | ०-३१-४०<br>०-१६ - ९०<br>एकूण ०-४८-३० | ३.०६ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल,**
**दिनांक : २०/०८/२०२२**

**सही/-**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**
**मो.नं. ८१०८५५८२८९**

पत्ता :- शॉप नं १३०, मुन्सीपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.


## श्री गोवर्धनी माता मंदिराचा जिर्णोद्धार सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कृष्णाष्टमीनिमित्त किल्ले गावठाण बेलापूर येथील श्री गोवर्धनी माता मंदिराचा १५ वा जिर्णोद्धार उत्साहात संपन्न झाला. या वेळी गोवर्धनी मातेची आराधना नवी मुंबई भाजपा महामंत्री व बेलापूर विधानसभा संयोजक निलेश म्हात्रे व स्वाती म्हात्रे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी मंदिरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. सर्व भाविक भक्तांचे सर्व संकट दूर होऊन सुख, शांती व समृद्ध जीवन सर्वांना लाभो, अशी प्रार्थना श्री गोवर्धनी मातेला केली असल्याचे बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले. नवी मुंबईतील सुमारे दीडशे वर्षापूर्वीचे पुरातन पेशवेकालीन एकमेव मंदिर म्हणजे



गोवर्धनी मातेचे मंदिर अशी आख्यायिका आहे. श्री गोवर्धनी मातेची प्राणप्रतिष्ठापना पेशवेकाळात झाली असून नवी मुंबईतीलच नव्हे तर संपूर्ण पंचक्रोशातील ठाणे रायगड, पालघर जिल्ह्यातील सर्व भाविक भक्तांना नवसाला पावणारी आई म्हणून श्री गोवर्धनी माता प्रसिद्ध आहे. नवी मुंबईतील सोनार, ब्राम्हण, आगरी कोळ्यांची कुलदेवता असलेली भक्तांच्या हाकेला धावणारी अशी श्री गोवर्धनी आईची जनमाणसात ख्याती आहे. श्री गोवर्धनी मातेचे मंदिर हे निसर्गाने मुक्तहस्ताने उधळण केलेल्या निसर्गरम्य टेकडीवर वसलेले असून हिरवळीने नटलेले आहे. मंदिराच्या पाठीमागे विस्तीर्ण असा समुद्र लाभलेला असून या पुरातन मंदिराचा जीणोद्धार १५ वर्षांपूर्वी उद्योजक विजय म्हात्रे व आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या हस्ते गोकुळाष्टमीच्या दिवशी करण्यात आला होता. दरवर्षी गोकुळ अष्टमीच्या दिवशी यथोचित पूजा अर्चा व उत्सव साजरा केला जातो.

## गणेशोत्सवाच्या खरेदीसाठी बाजारपेठांत गर्दी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून खरेदीसाठी सर्वत्र धावपळ दिसून येत आहे. दरम्यान, सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठा साहित्यांनी सजल्या आहेत.

गणेशोत्सवाचा प्रारंभ ३१ ऑगस्ट रोजी होत आहे. या मुळे खरेदीसाठी आठवडा राहिला आहे. गणेशोत्सवातील सजावट तसेच पूजा साहित्य खरेदीसाठी नागरिकांनी शनिवारी (२० ऑगस्ट) बाजारपेठेत गर्दी केली होती. गेले दोन वर्षे कोरोनामुळे सण-उत्सवांवर सावट होते. शासन नियमांमुळे सर्वत्र सण साधेपणाने साजरे होताना दिसत होते. दरम्यान, आता सर्व निर्बंध उठविण्यात आल्याने सगळेच सण उत्साहाने साजरे होताना दिसत आहेत. यावर्षी गणपती उत्सवही मोठ्या धुमधडाक्यात साजरा होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. कोकणात गणपती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. चाकरमान्यांनी कोकणात जाण्यासाठी तीन तीन महिने अगोदर रेल्वेचे बुकींग केले आहे. याशिवाय एसटी, खासगी गाड्यांमधूनही चाकरमानी थेट गाव गाठतात. दरम्यान, चाकरमान्यांची गावी जाण्यासाठी जोरदार तयारी सुरु झाली आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **१) श्री. सुधिर आबासाहेब जगदाळे २) श्री. आदित्य भरत जाधव** दोघेही रा. आंबिवली, ता. पनवेल, जि.रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**: मिळकतीचे वर्णन:**

**मौजे - आंबिवली, ता. पनवेल, जि.रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.पा.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १४ | १/अ/६ | ०-४६-००<br>पो.ख. ०-०२-००<br>एकूण ०-४८-०० पैकी<br>०-२६-००<br>पो.ख. ०-०२-००<br>एकूण ०-२८-००<br>एवढ्या क्षेत्राबाबत | ८.९४<br><br><br>५.०५ |

जमिनमालक यांच्या नावे असलेले क्षेत्र ०-२८-०० ( हे.आर.पॉ.) एवढ्या क्षेत्राबाबत

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तकारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल,**
**दिनांक : २०/०८/२०२२**

**सही/-**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**
**मो.नं. ८१०८५५८२८९**

पत्ता :- शॉप नं १३०, मुन्सीपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.


पान १ वरून

## मुंबई तोडण्याची कुणाचीही हिंमत नाही -देवेंद्र फडणवीस

माझे शरीर अमजद खानसारखे आहे आणि हे मला अमिताभ बच्चन म्हणतात, अशी मिश्किल टिप्पणी फडणवीसांनी केली.

देवेंद्र फडणवीस जहाँ खडे होते है, लाईन वहीं से शुरू होती है, असे आशिष शेलार यांनी म्हणताच उपस्थित कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी त्याला हसून दाद दिली. आशिष शेलार यांनी शोले चित्रपटातल्या गब्बर सिंगचा कितने आदमी थे हा डायलॉग म्हणताच, फडणवीसांनीही त्यावर, हो, हे मी विचारू शकतो. कितने आदमी थे? ६५ मे से ५० निकल गए और सबकुछ बदल गया. लेकिन, अब दो ही बचे है, पण त्यांचाही सन्मान आहे. आम्ही विरोधकांचा सन्मानच करतो, असे फडणवीस या वेळी म्हणाले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते रस्ता विकासकामाचे भूमिपूजन

सिडकोमार्फत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळबाधित प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनकरिता उलवे नोड पॅकेज-३ विकसित करताना जिल्हा परिषदेचा ७० वर्षे जुना तसेच गव्हाण, जावळे, शेलघर, न्हावा, न्हावाखाडी, कोपर, शिवाजीनगर ग्रामस्थांच्या रहदारीचा रस्ता उद्ध्वस्त केला होता. आम्रमार्गाच्या रचनेनुसार सर्व ग्रामस्थांना उलवे नोडमधूनच जावे लागत होते, मात्र हा गव्हाण फाटा ते गव्हाण हा रस्ता पुन्हा सुरू व्हावा, अशी ग्रामस्थांची मागणी होती. त्यानुसार माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिडकोकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून या रस्त्याच्या कामाला मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार या रस्त्याच्या कामाचा भूमिपूजन सोहळा पार पडला. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत या रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन झाले.

या सोहळ्याला भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य रवींद्र पाटील, कामगार नेते महेंद्र घरत, वहाळ येथील साईमंदिर संस्थानचे अध्यक्ष रविशेठ पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, सिडको अधीक्षक अभियंता श्री. गोसावी, श्री. फडके, गव्हाण ग्रामपंचायतीचे सदस्य सचिन घरत, योगिता भगत, प्रमोद कडू, रमेश घरत, रामदास नाईक, अश्विन नाईक, सचिन घरत, हेमंत पाटील, ठेकेदार पी. डी. देशमुख यांच्यासह पदाधिकारी, ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, सिडकोच्या माध्यमातून विकास होत असताना गावकऱ्यांच्या समस्या डावलून चालणार नाही. त्यामुळे सिडकोने ग्रामस्थांच्या समस्या सोडवाव्यात अशा सूचना दिल्या, तसेच राज्यात सत्तांतर झाले असून, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली वेगाने विकासकामे होत आहेत. त्यामुळे या रस्त्याचे कामही लवकरात लवकर होईल, अशी अपेक्षा व्यक्त करीत सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

## गद्दार म्हणणाऱ्यांना धडा शिकवू

यामुळेच अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महाड, माणगाव आणि पोलादपूर मतदारसंघाकरिता जवळपास ७४ कोटी ६० लक्ष रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली आहे. या कामांची यादीच आमदार गोगावले यांनी वाचून दाखवली. त्याचप्रमाणे जलजीवन मिशनमधून ३२ कोटी रुपये मंजूर केले असून महाडमधील एनडीआरएफ, प्रशासन भवन, शिवसृष्टी ही कामे मार्गी लागतील, असा विश्वासदेखील व्यक्त केला.

धरणांची कामे पूर्णत्वास नेली जातील. १० वर्षे केंद्रीय मंत्री राहिलेल्या अनंत गीते यांनी दहा मुले तरी कामाला लावली का? याचे उत्तर प्रथम देण्याचे आवाहन केले. आमचे सरकार हे सामान्य माणसाला बरोबर घेऊन जाणारे सरकार असून आम्ही कामे करतो म्हणून तळागाळातील माणूस आमच्याबरोबर आहे. त्यामुळे काम करणाऱ्याच्या बरोबर राहायचे की, काम न करणाऱ्यांबरोबर हे जनताच ठरवेल, असेही सांगितले.


**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन मालक **१) संतोष रामदास शेळके २) दत्तात्रेय रामदास शेळके ३) सुलोचना रामदास शेळके ४) सुवर्णा रामदास शेळके ५) सुधाबाई पांडुरंग शेळके ६) प्रमिला बाळकृष्ण पाठे ७) अनिता अर्जुन गावडे ८) कल्पना बाळु म्हात्रे ९) रामदास लक्ष्मण शेळके** सर्व रा. पाली खुर्द, ता. पनवेल, जि.रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - पाली खुर्द, ता. पनवेल, जि.रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र ( हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २१ | २/ ३ | ०-२६-३०<br>पो.ख. ०-०३-००<br>एकूण ०- २९-३० | ५.८० |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, वचनचिठठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**पनवेल,**
**दिनांक : २०/०८/२०२२**

**सही/-**
**निलेश द. हातमोडे**
**ॲडव्होकेट**
**मो.नं. ८१०८५५८२८९**

पत्ता :- शॉप नं १३०, मुन्सीपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.

# पनवेल परिसरात दहिहंडी सण उत्साहात

## भाजप नेत्यांची उपस्थिती; आयोजकांकडून स्वागत





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे नोड येथे श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, भाजप उलवे नोड १ आणि जिवदानी महिला उत्कर्ष मंडळाच्या वतीने दहिहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आयोजित केला होता. या दहिहंडी उत्सवात तब्बल एक लाख ५५ हजार ५५५ रुपयांचे पारितोषके देण्यात आली. या उत्सवाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत गोविंदा पथकांना सर्वोतरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

या दहिहंडी उत्सवाचे हे तिसरे वर्ष होते. आयोजकांच्या वतीने मनोरंजनात्मक गीत-नृत्याचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. ही हंडी फडण्याचा मान विचुंबे येथील दुर्गा माता दहिहंडी पथकाला मिळाला त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ५१ हजार रुपये आणि भव्य सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. दरम्यान, दिवस भरात ठाणे कल्याण, नवी मुंबई, उरण, पेण तसेच चेन्नई एका पथक असे एकूण ५० गोविंदा पथकांनी या ठिकाणी भेट देत सलामी दिली. या वेळी पाच थर लावणाऱ्या पथकाला दोन हजार, सहा थर लावणाऱ्या पथकाला २,५०० तर सात थर लावणाऱ्या पथकांना तीन हजार रुपये आणि सन्मानचिन्ह देण्यात आला.

या वेळी पनवेल तालुका अरुणशेठ भगत, उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, उलवे नोड अध्यक्ष मदन पाटील, गव्हाण विभाग अध्यक्ष अमर म्हात्रे, सरचिटणीस निलेश खारघर, उलवे नोड उपाध्यक्ष शैलेश भगत, उलवे नोड महिला मोर्चा अध्यक्षा निकीता खारकर, एमजीएम हॉस्पीटलचे डॉक्टर चटर्जी, आनंद शिंदे, डॉ. राठोड, उलवे नोड १चे सरचिटणीस अंकूश ठाकूर, बुथ अध्यक्ष सुहास गोंधळी, गीता ठाकूर, निलेश खोत, नितेश म्हात्रे, प्रणय कोळी, राष्ट्रपती पुरस्कार विजेते प्रभात कोळी, उलवे नोड केमीस्ट असोसिएशनच्या अध्यक्ष सीमा पाटील, अमोघ ठाकूर, श्वेता ठाकूर, प्रल्हाद गवळी, सीमा कांबळे, सुनंदा म्हात्रे, प्रिया अडसूळ, सेक्टर १८ महिला अध्यक्षा प्रिती चंदेल, वनीता बाबार, छाया चौधरी, नाना गडकरी, अलंकार म्हात्रे, नंदी ठाकूर, प्राजक्ता खोत, योगिता खोत, शितल पाटील, सुगंधा पाटील, वनिता गोंधळी, नामदेव ठाकूर, संतोष तूडमे, शंकर पाटील, नमिता नाईक, मच्छिंद्र कोळी, विक्रम कोळी, रामनाथ कोळी आदी उपस्थित होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते राष्ट्रपती पुरस्कार विजेते आणि आंतरराष्ट्रीय जलतरणपटू प्रभात कोळी याचा सत्कार करण्यात आला.

---





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोडपाली येथे स्वःत्रिंबक जोमा ठाकूर सामाजिक संस्था व अजिंक्य तारा मित्र मंडळाच्या वतीने भव्य दहिहंडी उत्सव २०२२चे आयोजन केले होते. या दहिहंडी उत्सवाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत बाळगोपाळांना शुभेच्छा दिल्या. या उत्सवात तीन लाख ३३ हजार ३३३ रुपयांची भरघोस बक्षिसे देण्यात आली.

रोडपाली येथे भाजप युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष अमर ठाकूर यांच्या आयोजनातून आणि स्वःत्रिंबक जोमा ठाकूर सामाजिक संस्था व अजिंक्य तारा मित्र मंडळाच्या वतीने भव्य दहिहंडी उत्सव आयोजित केला होता. या उत्सवात तीन लाख ३३ हजार ३३३ रुपयांची पारितोषके गोविंदा पथकांना देण्यात आली. या दहिहंडीचे प्रमुख आकर्षण टाइमपास फेम प्रथमेश परब हे होते, तसेच या वेळी ओम साई प्रोडक्शनच्या वतीने सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले असून या वेळी कलर्स मराठी टि.व्ही फेम अस्मिता सुर्वे यांनी आपली कला सादर केली. यंदाचे हे या उत्सवाचे १०वे वर्ष होते.

या वेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी प्रभाग समिती सभापती प्रमिला पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, माजी नगरसेविका विद्या गायकवाड, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रवीनाथ पाटील, कल्याण डोंबिवली महापालिकेचे नगरसेवक व माजी सरपंच महेश पाटील, डीडीएसआरचे सर्वेसर्वा राहुल हजारे, प्रभुदास भोईर, शिंदे गटाचे रामदास शेवाळे, पीएसआय महादेव इंगळे, आयोजक अमर ठाकूर, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, कलंबोली शहर महिला मोर्चा शहराध्यक्षा मनिषा निकम, सरचिटणीस दुर्गा सहानी, उपाध्यक्ष श्रीकांत ठाकूर आदी उपस्थित होते.

---

**खारघर :** भाजप खारघर मंडल आणि शिवप्रतिष्ठान सामाजिक संस्थेच्या वतीने सेक्टर ७ उत्सव चौक मैदानात मनाची भव्य दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, माजी नागसेविका अनिता पाटील, आरती नवघरे, नेत्रा पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, राजेंद्र मांजरेकर, अजय माळी, संतोष शर्मा, गीता चौधरी, साधना पवार, दीपक जाधव, भरत कोंढाळकर, अंकिता वारंगे, शोभा मिश्रा, प्रिया दळवी, विनोद ठाकूर, संजय मुलीक, गिरीश गुप्ता, शैलेश त्रिपाठी आदी उपस्थित होते.









**पनवेल :** खांदा कॉलनी सेक्टर ६ श्री कृपा हॉल समोर माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, युवा मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी तसेच दत्तात्रेय स्पोर्ट्स क्लबच्या वतीने भव्य दहिहंडी उत्सव आयोजित केला होता. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, कामोठे युवा मोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, युवा नेते हॅपी सिंग आदी उपस्थित होते. तसेच खांदा कॉलनी सेक्टर १३ येथे भाजप व श्री ओंकारेश्वर सामाजिक व सांस्कृतिक मंडळाच्या वतीनेही भव्य आमदार चषक दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला होता. या दहीहंडीचे आयोजन भीमराव पोवार आणि राजश्री पोवार यांनी केले. या वेळी माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, मोतीलाल कोळी, गणेश पोवार, रोहित कोळी, शितेष खानावकर, राहुल पोवार आदी उपस्थित होते.

**उलवे नोड :** सेक्टर १९ येथील बामणडोंगरी रेल्वे स्टेशन जवळ उलवे नोड राज युवा प्रतिष्ठानच्या वतीनेही दहिहंडी उत्सव २०२२चे आयोजन करण्यात आले असून या ठिकाणी गोविदा पथकांना एक लाख ११ हजार ११ रुपयांचे पारितोषके देण्यात आली. या उत्सवाचे यंदाचे हे दुसरे वर्ष होते. या वेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र म्हात्रे, माजी सैनिक निलेश शंकर म्हात्रे, एनआरआय पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रवींद्र पाटील, वहाळ येथील साई देवस्थानचे अध्यक्ष आर. के. पाटील, जिल्हा परिषद सदस्य रवींद्र पाटील, ज्येष्ठ पत्रकार माधवराव पाटील, भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष अमित नाईक आदी उपस्थित होते. तसेच शिवसंघर्ष प्रतिष्ठानच्या वतीने सेक्टर २० बामणडोंगरी रेल्वे स्टेशनजवळ दिहहंडी उत्सव आयोजीत करण्यात आला होता. या वेळी गोविंदा पथकांना एक लाख ११ हजार १११ रुपयांचे पारितोषिके देण्यात आली, तसेच खास महिलांसाठी तीन हजार ३३३ रुपयांचे रोख बक्षिस देण्यात आले. या उत्सवाचे यक्षित एन्टरप्रायझेस व गुरुराज इन्फ्रा यांच्या माध्यमातून आयोजन करण्यात आले होते. या उत्सवावेळी मंडळाचे अध्यक्ष अखिल यादव, अमोघ ठाकूर, मोहन गोरीवले, विजय शिंगरे, आदित्य भोसले, विशाल म्हात्रे, हितेश शिंगरे, राज सूर्यवंशी, धनंजय धोंडे, संग्राम घाडगे, कुलदीप त्रिवारी, आकाश देशमुख, प्रणय देशमुख आदी उपस्थित होते.




**उलवे नोड :** सेक्टर ८ खारकोपर येथील जय हनुमान मैदानात भाजप उलवे नोड २च्या वतीने भव्य दहिहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी अनेक गोविंदा पथकांनी भेट देत सलामी दिली. या ठिकाणी तीन लाख ५५ हजार ५५५ रुपांची पारितोषके देण्यात आली. या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, न्हावाशेवा पोर्ट विभाग असिस्टंट पोलीस कमिशनर धनाजी शिरसागर, न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे वरीष्ठ निरीक्षक मधुकर भटे, हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, गायक जगदीश पाटील, सुर नवा ध्यास नवा फेम श्वेता ठाकूर आयोजक तथा भाजप उलवे नोड २ अध्यक्ष विजय घरत, महिला मोर्चा उलवे अध्यक्ष योगिता भगत, ग्रामपंचायत गव्हाण सदस्या उषा देशमुख, खारकोपर अध्यक्ष सुधीर ठाकूर, किशोर पाटील, सुहास भगत, भाऊ भोईर, गजानन घरत, अमोघ ठाकूर आदी उपस्थित होते.



# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात स्टार्टअप आयडिया स्पर्धा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात स्टार्टअप आयडिया या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या उद्योजक कल्पनांना वाव देणे हा होता. या स्पर्धेमध्ये महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी उस्फूर्त असा प्रतिसाद दिला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रुपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले तसेच प्रा. महेश्वरी झिरपे, (समन्वयक-अंतर्गत गुणवत्ता कक्ष) शिक्षक -शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनींनी या स्पर्धेसाठी उपस्थित राहून स्पर्धेची शोभा वाढवली. या स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रवर शर्मा (अकाउंट व फायनान्स) विभाग प्रमुख यांनी केले. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. रीत ठुले यांनी काम पाहिले तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तनुजा सुमन यांनी केले, प्रा. मौसमी लांबे यांनी सहकार्य केले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे या सर्वांनी आयोजकांचे कौतुक केले.



## रिक्षाचालकाची चेन लांबवली

**पनवेल :** नवीन पनवेल भागात राहणाऱ्या एका रिक्षाचालकाला खारघर येथील कोपरा गावात बोलण्यात गुंतवून हजारो किमतीची सोन्याची चेन चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी खारघर पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. नवीन पनवेलमध्ये राहणारे रिक्षाचालक केतन फडके (वय २७) हे पनवेल रेल्वे स्थानकाजवळ प्रवाशांची वाट पाहत उभे होते. याच वेळी कामोठे येथील हॉस्पिटलमध्ये जाऊन परत यायचे आहे, असे सांगून एक भामटा त्यांच्या रिक्षात बसला होता. व त्याने बोलण्यात गुंतवून हजारो किमतीची सोन्याची चेन लंपास केल्याने याबाबतची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**पनवेल : भाजप युवा कार्यकर्ते रहीम लदाप यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, कामगार नेते महेंद्र घरत, तसेच भाजप उत्तर रायगड जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी अविनाश कोळी, कसळखंडचे उपसरपंच महेंद्र गोजे, भाजप शहर सरचिटणीस अमरिश मोकल, शिक्षक सेलचे जिल्हा संयोजक के. सी. पाटील, संजय जाधव, दीपक दुर्गे, अशोक अंबेकर, हरेश साठे, मयुर कदम, निशा वाडकर, मानवी पाटील आदी उपस्थित होते.**





**पनवेल : रिटेल व्यापारी असोसिएशन न्यू पनवेल यांच्यातर्फे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. नवीन पनवेलचे पीएसआय श्री. कोकाटे यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. या वेळी व्यापारी असोसिएशनचे सेक्रेटरी किसन पवार, खजिनदार पटेल, कमिटी मेंबर लधाभाई, नरशीभाई पटेल, विक्रम, कुमावत, रामजीभाई, प्रभतभाई, भिमजीभाई पटेल आदी उपस्थित होते.**



**पनवेल : टपाल नाका येथील ॐ चैतन्य कानिफनाथ मित्र मंडळाने गेली ४०० हून जास्त वर्षांची परंपेराचा जपत यंदा ही ५६ नवसाच्या हंड्या बांधल्या होत्या. परंपरागत चालीरीतीने देवाच्या हंड्या म्हणुन ख्याती असणारे हे मंडळ अजुनही जुन्या पध्दतीने सगळ्या गोष्टींचे जतन करते. यामध्ये ह्या हंड्या काठीने फोडण्यात येतात. हंड्या फोडल्यानंतर सुमारे ३०००/३५०० भाविकांना महाप्रसाद असतो. या वर्षी मोठ्या उत्साहात हंड्या फोडण्यात आल्या. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी उत्सवात भेट दिली. या वेळी आयोजकांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.**

रविप्रहर
राम प्रहर
www.ramprahar.com

# डिजिटल साक्षरता वाढली आणि सायबर गुन्हेही!

***भारतीय नागरिक डिजिटल व्यवहार करत आहेत, पण ते पुरेसे डिजिटल साक्षर नसल्याने सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. डिजिटल आणि ऑनलाईनच्या नव्या युगात भारतीयांना आपल्या वर्तनात काही बदल करून घ्यावे लागणार आहेत. ते त्यांनी केले नाहीत तर ते सायबर गुन्हेगारीचे शिकार होऊ शकतात.***

डिजिटल व्यवहार करणाऱ्यांची संख्या वेगाने वाढत चालली असून त्यातील अनेक जण नवे असल्याने त्यांना या व्यवहारांमधील फसवणुकीचे सापळे लक्षात येत नाहीत. पण एक गोष्ट येथे समजून घ्यावी लागणार आहे, ती म्हणजे आपल्याला आता पुढेच जायचे आहे. म्हणजे डिजिटल व्यवहार वाढतच जाणार आहेत. त्यामुळे त्याचे नियमही आपल्याला शिकून घ्यावे लागणार आहेत. दैनंदिन आयुष्यातील तंत्रज्ञानाचा वाढता वापर म्हणजे धरले तर चावते आणि सोडले तर पळते, अशी स्थिती झाली आहे. म्हणजे त्याचा अति वापर केला तर त्याचे दुष्परिणाम आहेत तर त्याचा स्वीकार केला नाहीतर आपण जगाच्या मागे राहू किंवा आपली कामे वेगाने होणार नाहीत, असे वाटत राहते. या दोन्हीही गोष्टी खऱ्या आहेत. त्यामुळे हे तंत्रज्ञान विवेकाने वापरणे, एवढा एकच पर्याय आपल्यासमोर आहे. नव्या सुविधांना दोष देण्याची पद्धत आपल्याकडे लोकप्रिय आहे. काहीही नवीन आले की त्याच्यामागे कोणाचा काय हेतू आहे, याची चर्चा केली जाते आणि आजुबाजूचे सर्व लोक त्या सुविधा वापरू लागले की हळूच आपणही त्या वापरण्यास सुरुवात करावयाची, असे अनेक जण करतात. तर दुसरीकडे प्रत्येक नवी सुविधा, तंत्रज्ञान वापरण्याचा अतिरेक करणारेही अनेकजण आहेत. अशा दोघा समूहांना विवेकाची गरज आहे.

अलीकडेच समोर आलेल्या एका माहितीच्या पार्श्वभूमीवर याचा विचार अधिक गांभिर्याने करण्याची वेळ आली आहे. मायक्रोसॉफ्ट ही कंपनी सायबर गुन्ह्यांच्या संदर्भात दरवर्षी एक पाहणी करते. तिने १६ देशांचा अभ्यास केला, ज्यात भारताचाही समावेश होता. पाहणीत लक्षात असे आले की 'बनावट कॉल सेंटर' च्या मार्गाने भारतात सायबर गुन्हे करून पैसे लुटण्याचे प्रकार वाढले आहेत. पाहणीनुसार या १६ देशातील १० पैकी सात गुन्हे भारतात घडत आहेत. भारतात मोबाईल फोनचा वापर जसजसा वाढत चालला आहे, तसे सायबर गुन्हेही वाढत चालले आहेत, असा याचा अर्थ.

### कॉल सेंटरपासून सावधान

अर्थात, या आकडेवारीने घाबरून जाण्याचे काही कारण नाही. कारण पाहणी करणाऱ्या कंपनीने या १६ देशातील इंटरनेट वापरणाऱ्या १६ हजार २५४ नागरिकांचाच सर्व्हे केला आहे. त्यामुळे तो शंभर टक्के बरोबर असण्याची शक्यता कमी आहे. शिवाय, भारताच्या लोकसंख्येचा विचार करता हे प्रमाण पाहिले तर ते धक्कादायक म्हणता येत नाही. या पाहणीतून बोध एकच घ्यायचा, तो म्हणजे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण वाढत चालले असून त्याचा फटका आपल्याला बसणार नाही, याची दक्षता आपल्याला घ्यावी लागणार आहे. आपल्या आजुबाजूला घडणाऱ्या घटनांविषयी आपण सजग राहिलो तरी पुरेसे आहे. उदा. ऑक्टोबर २०१९मध्ये कोलकता पोलिसांनी तेथे चालणाऱ्या दोन कॉल सेंटरवर छापा टाकून ती बंद केली होती. नोव्हेंबर २०१८ मध्ये दिल्लीमधील अशाच कॉल सेंटरवर छापा टाकून ६३ जणांना अटक केली होती. जून २०२१मध्ये गुरूग्राममध्ये आठ तर फरीदाबादमधील दोन कॉल सेंटर वर कारवाई करून बंद करण्यात आले. गावाची नावे ही आपल्यापासून खूप दूरची आहेत, म्हणून त्यांचा आपला संबंध नाही, या भ्रमात रहाता कामा नये. कारण तंत्रज्ञानामुळे विशेषतः इंटरनेटमुळे ही सर्व अंतरे संपुष्टात आली आहेत. शिवाय पुण्या-मुंबईतही गेल्या काही वर्षात अशा टोळ्या पकडल्याची उदाहरणे आहेतच.




अर्थ प्रहर



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

### भारतात ग्राहकांची संख्या अधिक

आपल्याला प्रश्न पडू शकतो की, मायक्रोसॉफ्ट कंपनीला या सायबर गुन्ह्यांची काळजी का वाटते. तर त्याचे कारण असे आहे की कॉलसेंटरवर जे व्हाईटकॉलर तरुण काम करतात, म्हणजे आपल्याला फसविण्यासाठी फोन करतात, ते आपण मायक्रोसॉफ्ट कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे सांगतात. जगातील अशा मोठ्या कंपनीच्या नावाने जर फसवणूक होऊ लागली तर ते कंपनीच्या प्रतिमेला तडा जाणारे ठरेल. दुसरे म्हणजे तंत्रज्ञानाविषयी भीती वाढली तर ते वापरणारे कमी होऊ शकतात, असेही या कंपनीला वाटू शकते. तिने ही पाहणी करण्यासाठी भारताची निवड केली, त्याचे कारणही अगदी उघड आहे. ते म्हणजे या कंपनीचे ग्राहक भारतात फार वेगाने वाढत आहेत. कारण कोरोना काळातील अभूतपूर्व परिस्थितीत स्मार्ट फोन, संगणक, लॅपटॉप आणि डेस्कटॉपचा वापर प्रचंड वाढला आहे. विशेषतः मुलांना शालेय शिक्षण ऑनलाईन घ्यावे लागल्याने याकाळात या तंत्रांचा वापर वेगाने वाढला आहे. अगदी ज्यांनी ऑनलाईनला आतापर्यत आपल्या आयुष्यात अजिबात स्थान दिले नव्हते, त्या सर्वांना त्याचा स्वीकार करावा लागला आहे. अशी प्रचंड बाजारपेठ अबाधित राहावे, यासाठी अशा कंपन्या खबरदारी घेणार, हे ओघाने आलेच.

### आपल्या तिजोरीचे दार उघडे?

कॉल सेंटरमध्ये काय चालते, हे आता सर्वांना माहीत झाले आहे. काही तरुण एकत्र येतात. ते काही नागरिकांचा डेटा कोठून तरी मिळवितात. त्याचा अभ्यास करतात आणि त्यातील काही जण हेरून त्यांना फोन करतात. आपण या या कंपनीचे प्रतिनिधी असून तिने फार चांगली योजना आणली आहे, ती तुम्हाला हवी असल्यास आपली थोडी माहिती हवी आहे, असे सांगतात. इतर माहिती घेता घेता आपली जन्मतारीख, आपले बँक खाते क्रमांक, आपला डेबिट किंवा क्रेडीट कार्ड क्रमांक, त्याच्या मागील तीन आकडे, बँकेचा पासवर्ड अशी सर्व माहिती मिळवून आपल्या खात्यातील रक्कम लंपास करतात. बँकेतून पैसे गेल्यावर एसएमएस येतो, तेव्हा ते लक्षात येते, पण त्याचा काही उपयोग नसतो. कारण तोपर्यत अशा कॉल सेंटरमधील मुलगा किंवा मुलीने, आपल्याला फोन ज्या सीममधून केलेले असते, ते सीम फेकून दिलेले असते! आपण पोलिसांत तक्रार देऊ शकतो आणि बँकेकडेही तक्रार करू शकतो. पण आपणच आपल्या तिजोरीचे दार उघडे करून दिलेले असल्याने आपले पैसे परत मिळण्याची शक्यता कमी होते.

### सायबरगुन्हे- पाच कारणे

भारतात असे प्रकार जास्त होतात, हा या पाहणीतील निष्कर्ष खरा मानला तर, त्याची कारणे अशी आहेत. १. भारतीय माणूस हा भावनिक असल्याने त्याला फसविणे सोपे आहे. कारण भावनिक माणूस सहजपणे सापळ्यात सापडतो. भावनिक असणे हे वाईट नाही. पण डिजिटल युगात ते महागात पडू शकते. २. प्रत्येकासाठी वेगळा स्मार्ट फोन, संगणक, लॅपटॉप आणि डेस्कटॉप अशी भारतात स्थिती नाही. ही सर्व यंत्रे आपण एकमेकांना शेअर करतो. अर्थातच, प्रत्येक जण त्यावर वेगवेगळ्या साईट पाहत असतो. त्यातील काही साईट या फसव्या किंवा डेटा चोरण्याचे कामे करत असतात. त्यांच्यामार्फत डेटा मिळवून फसविणे गुन्हेगारांना सोपे होते. ३. सर्व प्रकारचे शिक्षण आणि नोकरी व्यवसायाची कामे ऑनलाईन होऊ लागल्याने गेली दोन वर्षे ही यंत्रे वापरणारे अजूनही नवशिके आहेत. त्यामुळे एका छोट्या कृतीने एवढे मोठे नुकसान होऊ शकते, याची अनेकांना अजून जाणीव नाही.

४. गुंतवणुकीचे नवे मार्ग चोखाळताना शेअर बाजार आणि बिटकॉईनमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांची संख्याही वाढत चालली आहे. विशेषतः बिटकॉईनमध्ये गुंतवणूक करणारा डिजिटली अधिक साक्षर असण्याची गरज आहे. पण त्या स्थितीत अजून फार कमी भारतीय पोचले आहेत. त्यामुळे पासवर्ड सांभाळणे आणि त्यासंबंधीच्या भाषेचा सराव होणे गरजेचे आहे. ५. स्मार्ट फोन, संगणक, लॅपटॉप आणि डेस्कटॉप ही यंत्रे जेव्हा दुरुस्तीला दिली जातात, तेव्हा ती दुरुस्त करणाऱ्यावर आपला विश्वास असतो, पण पुढे त्याचा वापर कोण करणार आहे, यावर नियंत्रण राहीलच, असे होत नाही. अशावेळी सर्व डेटा सुरक्षित राहील, याची काळजी घेतली जात नाही.

### अशी दक्षता घेता येईल

*अर्थात, असे प्रकार होऊ नयेत, म्हणून सर्व बँका, रिझर्व बँक आणि सरकार अनेक प्रयत्न करत आहे. त्यातील काही ठळक असे- १. बँकेचा लॉगीन आयडी आणि पासवर्ड मिळवून पूर्वी बँकेतून पैसे चोरले जात होते. पण आता ऑनलाईन बँकिंग करताना बँकेकडे नोंद असलेल्या मोबाईल फोनवर एक नंबर येतो. तो टाकल्याशिवाय लॉगइन करताच येत नाही. २. एटीएममधून दुसऱ्याचे पैसे काढून घेण्याचे प्रकार घडत होते. आता काही एटीएममध्ये कार्डची पिन टाकल्यावर मोबाईलवर आलेला एक नंबरही टाकावा लागतो. तो टाकल्याशिवाय व्यवहार होत नाही. ३. तीनदा चुकीचा पासवर्ड टाकला तर त्या लॉगइन विषयी संशय घेऊन पुढील काही मिनिटे तो व्यवहार करण्यास मज्जाव केला जातो, तसेच आपण चुकीचा पासवर्ड टाकल्याने तो व्यवहार थांबविण्यात आला आहे, असा एसएमएस पाठविला जातो. म्हणजे दुसरा कोणी असा व्यवहार करत असेल तर मूळ खातेदाराला त्याची आगाऊ माहिती मिळू शकते. ४. आर्थिक व्यवहार नसलेल्या वेबसाईटचे पासवर्ड गुगलवर ऑटो सेव्ह करण्याची सोय आहे. मात्र आर्थिक व्यवहार होतात, अशा साईटचे पासवर्ड असे ऑटो सेव्ह होत नाहीत. ५. अँटी व्हायरस घेतलेला असेल तर सेफ बँकिंग अशी सोय त्यावर असते. ती आपल्याला फसव्या लिंक किंवा वेबसाईटपासून दूर ठेवते. ६. ऑनलाईन व्यवहारांमध्ये काय काय दक्षता घ्यावी, यासंबंधीचे जनजागरण रिझर्व बँक सर्व प्रसारमाध्यमांतून सातत्याने करते आहे. सह्याद्रीसारख्या सरकारी नियंत्रण असलेल्या चॅनलवर तर अशा व्यवहारात काय दक्षता घ्यावी, याविषयीचे संदेश सतत दिले जातात. ७. मोबाईलवर होणारे आर्थिक व्यवहार वाढल्याने फसवणूक करणे सोपे होत असल्याचे लक्षात आल्याने सीम कार्ड सहजपणे मिळणार नाही, याची काळजी घेतली जात आहे तर दुसरीकडे अशा गुन्ह्यांच्या तपासाला वेग यावा, यासाठी पोलिसांचे सायबर सेल स्थापन करण्यात येत आहेत, तसेच पोलिसांना विशेष प्रशिक्षण दिले जात आहे.*

---

# शेअर मार्केटचा राजा- राकेश झुनझुनवाला!

***भारतीय शेअर बाजारातील सर्वात मोठे गुंतवणूकदार म्हणून राकेश झुनझुनवाला यांचे नाव घेतले जाते. अगदी छोटी सुरुवात करून ४५ हजार कोटी रुपयांची संपत्ती त्यांनी मिळविली होती. शेअर बाजारातील गुंतवणुकीसाठी भारतीय गुंतवणूकदारांना प्रेरणा देणाऱ्या आणि भारताच्या विकासावर ज्यांचा प्रचंड विश्वास होता, अशा या 'बिग बुल' विषयी.***

बिग बुल नावाने ओळखले जाणारे राकेश झुनझुनवाला यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी १४ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांची संपत्ती ५ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त असूनही ते साधेपणाने रहात असत. एका इन्कम टॅक्स ऑफिसरचा मुलगा ते शेअर बाजारात अफाट यश प्राप्त करणारा अवलिया असा त्यांचा प्रवास थक्क करणारा आहे. चार्टर्ड अकाउंटं झाल्यावर १९८५ साली शेअर बाजारात त्यांनी कामाला सुरूवात केली होती. देशभरातील गुंतवणूकदार झुनझुनवाला यांनी कोठे गुंतवणूक केली यावर बारकाईने लक्ष ठेवून असत.

राकेश झुनझुनवाला यांनी टायटन कंपनीच्या शेअर्समध्ये गुंतवणूक करून मोठा फायदा मिळवला होता. २०२५साली सामाजिक कार्यासाठी पैसे खर्च करण्याची त्यांची इच्छा होती. जेव्हा राकेश झुनझुनवाला यांना पैसे गुंतवायचे असत तेव्हा कंपन्या त्यांच्याकडे धाव घेत.

### झुनझुनवाला यांची संपत्ती किती?

शेअर बाजारातून रेअर एन्टरप्राइजेस उद्योगाचे जाळे उभे केलेल्या झुनझुनवाला यांनी सुमारे ४५ हजार कोटींची संपत्ती कमावली आहे. हजारो कोटींची संपत्ती असलेल्या झुनझुनवाला यांचा प्रवास फक्त ५,००० रुपयांपासून सुरू झाला होता. १९८५ साली बाँबे स्टॉक एक्स्चेंजचा सेन्सेक्स १५० अंकांच्या जवळ होता. त्या वेळी लोकांना शेअर बाजार हा जुगार वाटत असायचा. पण नेहमी अभ्यास करणाऱ्या धाडसी निर्णय घेणाऱ्या झुनझुनवाला यांनी शेअर बाजाराची नस अचूक पकडली होती.

गुंतवणुकीचे पर्याय त्या काळात मर्यादित होते. बाजार नियंत्रित नसल्यामुळे गुंतवणूकदारांना पैसे गुंतवताना भीती वाटायची. त्यावेळी लोक बँक एफडीमध्येच पैसे गुंतवत असत. त्या काळामध्ये झुनझुनवाला यांनी हिंमत दाखवून मोठी गुंतवणूक केली होती.

### टायटनच्या शेअरने बदलले आयुष्य

राकेश झुनझुनवाला यांनी टायटन कंपनीचा शेअर विकत घेतला तेव्हा त्याची किंमत ३ रुपये होती. झुनझुनवाला यांच्या आवडीचा हा शेअर होता. त्याची किंमत सध्याच्या घडीला जवळपास २ हजार ४७२ रुपये आहे. त्यांच्याकडे टायटन कंपनीचे जवळपास ११,०८६ कोटी रुपयांचे शेअर्स होते. या कंपनीमध्ये झुनझुनवाला यांचा जवळपास ५.१० टक्के हिस्सा आहे.

### बेअर ते बिगबुल पर्यंतचा प्रवास

१९९२ साली झालेल्या घोटाळ्यामध्ये अनेक जण रस्त्यावर आले होते. झुनझुनवाला यांचा या काळात कोणताही तोटा झाला नाही. उलट या वेळी त्यांनी शॉर्ट सेलिंगमधून कोटयवधी रुपयांचा नफा कमावला. त्यांचे राधाकृष्ण दमाणी हे या व्यवसायात सहकारी होते. दमाणी यांनी हर्षद मेहता घोटाळ्यानंतर शेअर बाजारातून माघार घेतली आणि रिटेल व्यवसायाला सुरुवात केली. याच काळात झुनझुनवाला यांनी शेअर बाजारातच जास्तीत जास्त गुंतवणूक करून स्वतःचा जम बसवला.



### या कंपन्यांमध्ये होती गुंतवणूक

राकेश झुनझुनवाला यांनी सर्वाधिक गुंतवणूक टायटन या कंपनीत केली होती. त्यांनी या कंपनीमध्ये ९ हजार १७४ कोटी रुपये गुंतवले होते. २०१७ साली शेअर बाजार जोमात असताना एकाच दिवसात त्यांनी या शेअर्समधून ९०० कोटी रुपये कमावले होते. त्यांनी स्टार हेल्थ कंपनीत ५ हजार ३७२, मेट्रो ब्रॅण्ड कंपनीत २ हजार १९४ गुंतवले होते. टाटा उद्योग समूहाच्या टाटा मोटर्समध्ये १ हजार ६०६ तर क्रिसिल कंपनीत १ हजार २७४ कोटी रुपये गुंतवले होते.

राकेश झुनझुनवाला यांचे मुंबईतील महागड्या मलबार हिल भागामध्ये घराचे बांधकाम सुरु होते.


### झुनझुनवालांच्या हालचालींवर लक्ष

शेअर मार्केटमध्ये राकेश झुनझुनवाला हे नाव कायम चर्चेत असायचे. त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवले जायचे. बाजारामध्ये जेव्हा अस्थिरता निर्माण व्हायची तेव्हा गुंतवणूकदारांचे लाखो रुपये बुडत असत पण झुनझुनवाला यांच्या गुंतवणुकीवर होणारा परिणाम मर्यादित असायचा. आणि तोटा होत असला तरी ते निवांत असायचे.

भारतीय शेअर बाजाराचा सुवर्णकाळ अजून सुरू व्हायचा आहे असे त्यांचे नेहमीचे वाक्य असायचे. याला ते Mother of all Bull Runs असे म्हणायचे. भारताच्या प्रगतीवर त्यांचा प्रगाढ विश्वास होता. नेहमीच बाजारामध्ये आक्रमकता न दाखवता संयम ठेवायला हवा हे त्यांनी उदाहरणातून पटवून दिले. त्यांनी संयम आणि अभ्यास करून गुंतवणूक केल्यामुळे शेअर बाजारात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले होते. लाखो भारतीयांना शेअर बाजारात गुंतवणूक करण्यास 'बिग बुल' झुनझुनवाला यांनी प्रेरणा दिली.



अभिजित कोळपकर
abhijeetjk.ca@gmail.com




---

## अर्थसाक्षर स्पर्धा : ३२
### निकाल पुढीलप्रमाणे

**प्रश्न क्र. १. भारताला आपल्या गरजेच्या इतकी टक्के इंधनाची आयात करावी लागते?**
***आ.*** ८५ टक्के

**प्रश्न क्र. २. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी फेब्रुवारी २०१९पासून देशातील किती शेतकरी कुटुंबांना मिळतो आहे?**
***ई.*** १० कोटी

**प्रश्न क्र. ३. जगातील सुमारे शंभर देशांना मोटारींची निर्यात करणारी भारतीय कंपनी कोणती?**
***इ.*** मारुती सुझुकी

**अर्थसाक्षर स्पर्धा ३२च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा ३२साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३३

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. टाटा उद्योग समूहातील सर्वात मोठ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीचे नाव काय आहे?**
***अ.*** टाटा एलेक्सी — ***आ.*** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)
***इ.*** टाटा टेलिसर्व्हिसेस लिमिटेड — ***ई.*** टाटा सन्स लिमिटेड

**२. पुढीलपैकी कोणती एक बँक सार्वजनिक क्षेत्रातील म्हणजे सरकारी आहे?**
***अ.*** एक्सिस बँक — ***आ.*** आयडीबीआय बँक
***इ.*** बंधन बँक — ***ई.*** इंडिया ओव्हरसीज बँक

**३. शेअर बाजाराच्या निफ्टी इंडेक्समध्ये किती कंपन्यांचा समावेश आहे?**
***अ.*** १० — ***आ.*** ३०
***इ.*** ५० — ***ई.*** १००

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# गणेशोत्सवापूर्वी होणार प्राथमिक शिक्षकांचे पगार

## ▌शिक्षण सेवकांचे प्रस्ताव तातडीने मंजुरीसाठी पाठवण्याचे आदेश

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांचे पगार गणेशोत्सवापूर्वी होणार आहेत. २९ऑगस्ट रोजी शिक्षकांचे पगार करण्याचे नियोजन आहे आणि त्या दृष्टीने हालचाली सुरू असल्याचे राजिप शिक्षण विभागाने शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाला सांगितले.

शिक्षकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या आणि प्रलंबित प्रश्नांच्या मुद्यावर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक परिषदेच्या शिष्टमंडळाने नुकतीच रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व शिक्षणाधिकारी पुनिता गुरव यांची भेट घेतली. या वेळी विविध मुद्यांवर सविस्तर चर्चा झाली.

शिक्षण सेवकांचा कालावधी १३ सप्टेंबर २०२२ अखेर पूर्ण होत असल्याने त्यांचे प्रस्ताव गटाकडून तातडीने माहितीसह जिल्हा परिषदेकडे मंजुरीसाठी मागविण्यात यावेत, ही मागणी शिष्टमंडळाने केली. त्यावर सीईओ किरण पाटील व शिक्षणाधिकारी गुरव यांनी, संबंधितांना तातडीचे आदेश


(प्रातिनिधीक छायाचित्र)

दिले जातील, असे आश्वासन दिले. तसेच जो पूर्वीचा प्रस्ताव नमुना आहे, त्या प्रमाणे प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना दिल्या असल्याचे सांगितले.

स्थायीत्व प्रमाणपत्र प्रस्ताव गटाने अद्यापही पाठवलेली नाहीत, संघटनेच्या प्रतिनिधींनी पंचायत समिती स्तरावर जे प्रस्ताव प्राप्त झालेले असतील ते पाठवण्याची व्यवस्था करावी, त्यांना तातडीने मान्यता देण्यात येईल. तसेच आवश्यक असणारे गोपनीय अहवाल लगतच्या मागील तीन वर्षाचे जोडावेत, अशा सूचना दिल्या आहेत.

शिक्षकांची प्रलंबित असणारी वैद्यकीय

### शिक्षक परिषदेच्या पाठपुराव्याला यश

बिले, फंडाची प्रकरणे या संदर्भात या वेळी सविस्तर चर्चा करण्यात आली. वरिष्ठ वेतनश्रेणीचे प्रस्ताव प्रत्येक गटाने तातडीने पाठवावेत जेणेकरून वरिष्ठ वेतनश्रेणी प्रस्ताव निकाली काढणे प्रशासनाला सोयीचे होईल, या संदर्भात सकारात्मक चर्चा झाली.

महाड तालुक्यातील शिक्षकांच्या सेवापुस्तकांचे मागील वर्षीच्या महापुरात नुकसान झाले आहे. या संदर्भामध्ये प्रश्न उपस्थित केल्यानंतर महाड पंचायत समितीचे लेखनिक गोलार यांच्याशी फोनवरून चर्चा करून संबंधितांना तातडीने माहिती पाठविण्याचे आदेश शिक्षणाधिकारी यांनी दिले आहेत.

शिक्षण सेवकांच्या तारखेविषयीचे संभ्रम दूर करण्यासंदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांनी तातडीने पत्र काढून संबंधिताना तसे लेखी कळवले आहे. शिक्षण सेवकांनी २५ तारखेपूर्वी आपले तारखेबाबतचे वैयक्तिक अर्ज, प्रस्ताव दिलेल्या विहित नमुन्यात माहितीसह पंचायत समिती स्तरावर सादर करावे. जेणेकरून तीन वर्षाचा शिक्षण सेवक कालावधी पूर्ण होईपर्यंतच्या आत त्यांचा तारखेचा प्रश्न निकाली काढण्यात प्रशासनाला सोयीचे होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, जुन्या शिक्षक पेन्शन संघटनेचे जिल्हाध्यक्ष मंदार रसाळ, वैभव पिंगळे , विजय येलवे, विकास नाडेकर, गणेश भोये, विनोद तुपे, भूषण जाधव , चंद्रकांत बैसाने, भूमी चौरे, मनीषा चिकने आदि या शिष्टमंडळामध्ये सहभागी झाले होते.

# गणेशोत्सव शांततेत व सुरक्षीतपणे साजरा करा –पोलीस निरीक्षक अशोक थोरात

## रेवदंडा पोलीस ठाण्यात नागरिकांची बैठक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

गणेशोत्सव शांततेने व सुरक्षीतपणे साजरा करण्याचे आवाहन रेवदंड्याचे पोलीस निरीक्षक अशोक थोरात यांनी नुकताच पोलीस ठाण्यात आयोजीत केलेल्या नगारिकांच्या विशेष सभेत केले.


(छाया : महेंद्र खैरे)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर रेवदंडा पोलीस ठाण्यात गुरुवारी सायकांळी विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत पोलीस निरीक्षक अशोक थोरात उपस्थितांना मार्गदर्शन करीत होते. या वेळी पोलीस निरीक्षक थोरात यांनी गणेशोत्सवात शांतता व सुरक्षीततेच्या दृष्टीने घ्यावयाच्या दक्षतेबाबत उपस्थितांशी चर्चा केली. तर गणेशोत्सवात येत असलेल्या विविध समस्या व अडचणींबाबत उपस्थितांनी अशोक थोरात यांना दिली.

गणेश विसर्जन यात्रेच्या दिवशी रेवदंडा पारनाका परिसरात वाहतूक कोंडी होते, ती टाळण्यासाठी त्या दिवशी सायकांळी चौल नाका व मोठे बंदर येथून रेवदंडा बाजारपेठ रस्ता वाहतुकीसाठी बंद ठेवावा, व ती वाहतूक रेवदंडा बायपास मार्गाने वळवावी, अशी सूचना सुहास घोणे यांनी या सभेत केली. त्याबाबत पोलीस निरीक्षक थोरात यांनी नियोजन करण्याचे आश्वासन या वेळी दिले.

रेवदंडा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे, शांतता कमिटी, मोहल्ला कमिटी, ग्रामरक्षक दल, सागर सुरक्षा दल यांचे प्रतिनिधी तसेच पोलीस पाटील, पत्रकार, समाज अध्यक्ष, तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष आणि प्रतिष्ठीत नागरिक या विशेष सभेला उपस्थित होते.

# विळे आदिवासीवाडीत हाणामारी

## ▌माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील विळे आदिवासीवाडीत शिवी दिल्याच्या कारणावरून गुरुवारी (दि. १८) सायंकाळी दोन गटात हाणामारी झाली. या प्रकरणी दोन आरोपींवर माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहितीनुसार, सुनील बबन पवार (वय २६), बाबा लालू वाघमारे (वय ३५) व विनोद वसंत पवार (वय २६) हे एकाच गावातील राहणारे असून गुरुवारी सायंकाळी सुनील हा विनोद याच्या घरासमोर येऊन शिवीगाळ करू लागला. त्यावेळी म्हणून विनोद घराचे बाहेर आला असता, सुनीलने वाडीतील पाण्याचा सार्वजनिक नळ उपटून विनोद याला मारहाण करू लागला. त्यांचे भांडण सोडविण्यासाठी आलेल्या हिराबाई वसंत पवार (वय ५५) आणि सविता विनोद पवार(वय २४, दोघी रा. विळे आदिवासीवाडी) यांनाही सुनीलने हाताबुक्याने मारहाण केली. बाबा वाघमारे यानेही विनोदला हाताबुक्याने मारहाण केली. सुनीलने विनोदच्या मोटारसायकलचे नुकसान केले.

या प्रकरणी विनोद पवार यांने दिलेल्या फिर्यादिवरुन माणगाव पोलीस ठाण्यात सुनील पवार आणि बाबा वाघमारे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास हवालदार तोरवे करीत आहेत.

# गणेशोत्सवासाठी अलिबाग–सावंतवाडी एसटी बस सोडणार



**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सवासाठी चाकरमान्यांना आपल्या गावी जाता यावे, याकरिता अलिबाग एसटी आगारातून २९ ऑगस्ट रोजी सकाळी सावंतवाडी बस सोडण्यात येणार आहे.

अलिबाग एसटी आगारातून दरवर्षी गणेशोत्वासासाठी सावंतवाडी बस सोडली जात असे. मात्र कोरोनामुळे मागील दोन वर्षे अलिबागमधून सावंतवाडी बस सोडण्यात आली नव्हती. यंदा सावंतवाडी बस सोडावी, अशी मागणी केली जात होती. त्याचा विचार करून सावंतवाडी बस सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अलिबाग एसटी आगारातून अलिबाग–सावंतवाडी या मार्गावर २९ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता शिवशाही बस सोडण्यात येणार आहे. ही बस वडखळ, नागोठणे, कोलाड, इंदापूर, माणगाव, महाड, खेड, चिपळूण, संगमेश्वर, लांजा, राजापूर, कणकवली मार्गे जाईल, अशी माहिती अलिबाग आगार व्यवस्थापकांनी दिली. अलिबाग आगारातून सावंतवाडी बस सोडण्याचा निर्णय घेतल्याबद्दल गणेशभक्तांनी अलिबाग एसटी आगार व्यवस्थापकांचे आभार मानले आहेत.

अलिबाग–सावंतवाडी बस एकच दिवस (दि. २९) सोडण्यात येणार आहे. परंतु या मार्गावर प्रवास करणारे प्रवासी जास्त आहेत. त्यामुळे ३० ऑगस्ट रोजीदेखील अलिबाग–सावंतवाडी बस सोडावी, अशी मागणी गणेशभक्तांनी केली आहे.

(छाया : महादेव सरसंबे)



# रोह्यातील मोरे महिला महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन

**रोहे : प्रतिनिधी**

भारतीय ग्रंथालय चळवळीचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जयंतीनिमित्त रोहा तालुक्यातील धाटाव येथील एम. बी. मोरे महिला महाविद्यालयात ग्रंथ प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि ती वृद्धिंगत व्हावी, यासाठी मोरे महाविद्यालयाच्या ग्रंथालय समितीने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले होते. कथा संग्रह, कविता संग्रह, कादंबऱ्या यांच्यासह विविध विषयावरील संदर्भ ग्रंथ, शब्दकोष या प्रदर्शनात ठेवण्यात आले होते.

संस्थेचे सदस्य अशोक मोरे, प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, प्रा. योगिता नेहेते, प्रा. नितेश मोहिते, प्रा. नरेश घाग, प्रा. दीपेश भोसले, प्रा. हणमंत ढवळे महाविद्यालयातील ३०० विद्यार्थिनींनी या प्रदर्शनास भेट दिली. महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभाग प्रमुख निर्मला थोरात यांनी ग्रंथ प्रदर्शन भरविण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# धोंडसे शाळेत गोपाळांची पंगत

## ▌माजी सैनिकांनी विद्यार्थ्यांना केले मार्गदर्शन

**पाली : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त सुधागड तालुक्यातील धोंडसे येथील प्राथमिक शाळेत विविध उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून शाळेत 'गोपाळाची पंगत' उपक्रमासाठी माजी सैनिकांनी मुलांना मिष्ठान्न दिले. तसेच 'सैनिक आपल्या भेटीला' या उपक्रमाअंतर्गत गावातील माजी सैनिक अनंत जाधव यांनी मुलांना फौज व देशाभिमान, चळवळ, उठाव, क्रांतीकारक याबद्दल मार्गदर्शन केले.


(छाया : धम्मशील सावंत)

गोपाळांची पंगत उपक्रमासाठी अमोल कुंभार यांनी फळ वाटप केले. या उपक्रमात रांगोळी, चित्रकला, वक्तृत्व आणि निबंध आदि स्पर्धा तसेच मनोरंजनात्मक खेळ, घेऊन मुलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यात आला. महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यात मोबाइलचे दुष्परिणाम, ऑनलाइन खरेदी व फसवणूक, स्वच्छता अभियान, आर्थिक साक्षरता, आरोग्य शिबिर, गावाचा इतिहास, राष्ट्राचा इतिहास, वृक्षारोपण या विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

तहसीलदार दिलीप रायन्नावार, गटविकास अधिकारी विजय यादव, गटशिक्षण अधिकारी साधुराम बांगरे, केंद्रप्रमुख कल्पना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम राबविण्यात आले. या सर्व उपक्रमात शाळा व्यवस्थापन समितीनेही सहभाग घेतला.

# कलोते येथे कर्करोग तपासणी शिबिर

**खालापूर, मोहोपाडा : प्रतिनिधी**

चौक प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कलोते उपकेंद्र येथे टाटा मेमोरीयल हॉस्पीटलच्या सहकार्याने कर्करोग तपासणी शिबिर आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये Oral cancer, breast cancer, . Cervical cancer यांची screening करण्यात आली. या शिबिराचा लाभ ६५ महिलांनी घेतला.

खालापूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसाद रोकडे, वैद्यकिय अधिकारी डॉ. किरण पवार, टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे कर्करोग प्रतिबंधक तज्ज्ञ डॉ.प्रियंका आखाडे, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. प्रतिभा देशमुख, सोशल वर्कर दिनेश मुसळे, नम्रता सरवदे, सुहासिनी कांबळे, सीमा पिसे, मनीषा जाधव, अर्चना महाडिक, ब्रिजभान कुमार यांच्यासह कलोते उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, टाटा हॉस्पिटल मेडिकल व कलोते उपकेंद्राचे कर्मचारी, पंचायत समितीच्या आशा सेविका व ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.



(छाया : अरूण नलावडे)

# कर्जतमध्ये गणेशमूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण

**कर्जत : बातमीदार**

सह्याद्री प्रतिष्ठान या संस्थेच्या कर्जत विभागा तर्फे कर्जत शहरातील भिसेगाव येथील श्री अंबामाता मंदिरात शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती बनवण्याचे प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. त्यात ४३ कलाकार सहभागी झाले होते. या वेळी तालुक्यातील आदिवासी मुलींनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शनही भरविण्यात आले होते.

### सह्याद्री प्रतिष्ठानचा उपक्रम

प्रतिष्ठानकच्या कर्जत विभागाचे मार्गदर्शक शरद ठाणगे आणि शिशु मंदिर शाळेच्या मुख्याध्यापिका रेखा गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशिक्षण शिबिराला सुरुवात झाली. या वेळी मूर्तिकार शिवम कुंभार आणि यश रुद्रकार उपस्थित होते. कर्जतच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, नगरसेवक उमेश गायकवाड, अभिनव ज्ञान प्रशालेचे निवृत्त शिक्षक नंदकुमार मणेर आणि प्रसाद मनोहर थोरवे यांनी शिबिराला भेट दिली. कर्जत तालुक्यातील डोंगरपाडा येथील १००आदिवासी मुलींनी तयार केलेल्या वस्तूंचे स्टॉल या ठिकाणी लावण्यात आले होते. या स्टॉलना नागरिकांनी भेटी दिल्या आणि वस्तूंची खरेदीदेखील केली.

प्रतिष्ठानचे कर्जत तालुका अध्यक्ष सुधिर साळोखे, उपाध्यक्ष सूरज खडे, शहर अध्यक्ष प्रणव जंगम, प्रशासक मिथिलेश म्हामूणकर, सह्याद्री विद्यार्थी अकादमीच्या स्वप्नाली पाटील, कौस्तुभ पेठे यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.


(छाया : संतोष पेरणे)

# पेण येथे डीएलएलई युनिटची प्रशिक्षण बैठक

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या डीएलएलई यूनिटची प्रथम सत्र प्रशिक्षण बैठक नुकतीच पेणमधील भाऊसाहेब नेने महाविद्यालयात पार पडली.

रायगड जिल्ह्यातील २८ महाविद्यालयांतील प्राध्यापक व स्टुडंट मॅनेजर आणि मुंबई विद्यापीठातील मान्यवर या बैठकीला उपस्थित होते.

डीएलएलई युनिटचे समन्वयक डॉ. देविदास बामणे यांनी मान्यवरांचे स्वागत केले. युनिटचे नवनिर्वाचित संचालक डॉ. कुणाल जाधव यांनी यूनिटबद्दल सविस्तर माहिती दिली. डॉ. विश्वंभर जाधव यांनी शारीरिक व मानसिक तणावमुक्ती यावर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

या वेळी डॉ. देविदास शिवपुरी, डॉ. जयशंकर पांडेय, डॉ. विनोद इंदुलकर उपस्थित होते. ॲड. मंगेश नेने यांच्या अध्यक्षीय भाषणाने बैठकीचा समारोप झाला.

# माथेरान नगरपालिकेकडून गुणवंतांचा सन्मान





**कर्जत : बातमीदार**

कोरोना काळात रुग्णांवर उपचार करणारे आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच शहरातील अन्य गुणवंतांना स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त माथेरान नगर परिषदेकडून सन्मानित करण्यात आले.

कोरोना काळात स्वत:च्या जीवाची पर्वा न करता माथेरानमध्ये रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉ. रुपाली मिसाळ आणि आरोग्यसेविका स्नेहा गोळे यांना पंत्रप्रधान कार्यालयाने प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित केले आहे. त्यांच्यासह नगर परिषदेच्या बी. जे. रुग्णालयातील आरोग्य कर्मचारी वनिता दिघे, राजेश वाघेला, सदानंद इंगळे तसेच कोरोना काळात काम करणारे स्थानिक धीरज सावंत, किशोर कोकळे, निमेश मेहता, किशोर मोरे, वैष्णवी चव्हाण, प्राजक्ता शिंदे, रेशमा काळे, तन्वी दिघे, अंगणवाडी सेविका शबाना महापुळे, स्मिता गायकवाड, रमा आखाडे यांना माथेरान नगर परिषदेने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त नुकतेच शाल, श्रीफळ देऊन गौरविले. माथेरान नगर परिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे शिंदे, महसूल अधिकारी दीक्षांत देशपांडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे, माजी नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांच्यासह नागरिक या वेळी उपस्थित होते.

# नवी मुंबईत स्वाईन फ्ल्यू टेस्टींगला सुरुवात

## कोविड आरटी-पीसीआर लॅबमध्ये सुविधा

**नवी मुंबई : बातमीदार**

कोविड प्रभावित काळामध्ये आयसीएमआर शासकीय परवानगीसह केवळ ११ दिवसांच्या कालावधीत सुरू केलेल्या नवी मुंबई महापालिकेच्या माँसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालय, नेरूळ येथील आरटी-पीसीआर लॅबमुळे जलद रिपोर्ट प्राप्त होऊन कोविडचा प्रभाव रोखण्यासाठी अतिशय मोलाची मदत झाली. प्रतिदिन ५००० टेस्ट्स क्षमतेच्या या लॅबमध्ये ४ ऑगस्ट २०२० पासून दोन वर्षांत आतापर्यंत १३ लाख ७३ हजार २८८ इतक्या कोविड टेस्ट झालेल्या आहेत.

नवी मुंबई महापालिकेची स्वत:च्या मालकीची ही अत्याधुनिक लॅब म्हणजे आरोग्य सुविधांच्या दृष्टीने कायमस्वरूपी उपलब्धी असून कोविड नंतरच्या काळात ही लॅब इतर विविध तपासण्यांसाठी सुविधाजनक ठरेल असे महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी सूचित केले होते. त्या अनुषंगाने सध्याचा स्वाईन फ्ल्यूचा वाढता प्रभाव बघता या लॅबमध्ये आता स्वाईन फ्ल्यूच्या एच १ - एन १ टेस्टिंगला सुरुवात झालेली आहे.

सद्यस्थितीत नवी मुंबई महापालिका क्षेत्रात आढळणाऱ्या संशयित स्वाईन फ्ल्यू रूग्णांचे एच १-एन १ सॅम्पल एनआयव्ही, पुणे या लॅबला पाठवण्यात येत होते. तथापि तेथून रिपोर्ट प्राप्त होण्यास लागणारा काहीसा कालावधी आता नवी मुंबई महापालिकेच्या स्वतःच्या लॅबमध्ये टेस्ट्स केल्याने वाचणार असून त्यामुळे संशयित रुग्णावर जलद सुयोग्य उपचार करणे शक्य होणार आहे. केंद्रीय आरोग्य विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तीव्र लक्षणे असणाऱ्या रुग्णांचेच सॅम्पल्स टेस्टींगकरिता घेतले जात असून पाच रुग्णांचे सॅम्पल्स टेस्टींगसाठी घेण्यात आलेले आहेत. नवी मुंबई महापालिका क्षेत्रात स्वाइन फ्ल्यूचा पहिला रुग्ण १९ जुलै २०२२ रोजी आढळला होता. पालिका क्षेत्रात आत्तापर्यत एकूण ७४९६८ इतक्या फ्ल्यू सदृष्य रुग्णांची ओपीडीमध्ये स्क्रिनिंग करण्यात आलेली असून ३३ रुग्णांना स्वाइन फ्लूची लागण झाली असल्याचे आढळून आले आहे. यापैकी सद्यस्थितीत सहा रुग्ण उपचाराधीन आहेत.





महापालिकेच्या वतीने मध्यम अथवा तीव्र स्वरूपाची स्वाइन फ्लूची लक्षणे असणाऱ्या रुग्णांना उपचाराकरिता सार्वजनिक रुग्णालय वाशी येथे उपचार सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. या रुग्णांचे नमुने सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथे संकलित करून माँसाहेब मिनाताई ठाकरे रुग्णालय, नेरूळ येथील लॅबमध्ये तपासणी करण्यासाठी पाठविण्यात येत आहेत.

स्वाईन फ्लू हा आजार एन्फ्लुएन्झा एच १ - एन १ या विषाणूमुळे होतो. नवी मुंबई पालिकेची नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व रुग्णालये येथे प्रत्येक फ्ल्यू सदृश्य रुग्णांची ताप, घसादुखी, घशाला खवखव, खोकला, नाक गळणे, अंगदुखी, डोकेदुखी या लक्षणांबाबत विचारपूस करण्यात येते. अशा प्रकारच्या रुग्णांमध्ये इतर कोणतेही निदान झाले नसल्यास एन्फ्लुएन्झा करिता तपासणी करण्यात येते. अशा फ्ल्यू रुग्णांचे त्यांच्या लक्षणाच्या आधारे तीन गटांमध्ये वर्गीकरण करण्यात येते. त्यापैकी सौम्य फ्ल्यू रुग्णांवर लक्षणानुसार नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर उपचार करण्यात येतो. व अशा रुग्णांच्या निकट सहवासितांचा शोध घेऊन आवश्यकतेनुसार त्यांच्यावरही उपचार करण्यात येतो. अति जोखमीच्या घरगुती निकट सहवासितांना विशेष लक्ष देणेकरिता सल्ला देण्यात येऊन त्यांना प्रतिबंधात्मक स्वरूपात मार्गदर्शक सूचनांनुसार उपचार देण्यात येतात.

> **शाळेत जाणारे विद्यार्थी, शिक्षक आणि शाळेत काम करणाऱ्या इतर कर्मचाऱ्यांमध्ये फ्लू सदृश्य लक्षणे आढळल्यास त्यांनी आवश्यक वैद्यकिय उपचार घ्यावेत व शक्यतोवर लोकसंपर्क टाळावा. स्वाइन फ्लू आजाराबाबत घाबरून न जाता योग्य माहिती, योग्य वैदयकिय सल्ला व प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन आजाराचा प्रसार थांबवावा.**
>
> -अभिजित बांगर, नवी मुंबई महापालिका

### प्रतिबंधात्मक लसीचे आतापर्यंत १४९९ लाभार्थी

**स्वाइन फ्ल्यूवर प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून शासनामार्फत दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीतील गरोदर माता, उच्च रक्तदाब किंवा मधुमेह असणाऱ्या व्यक्ती तसेच फ्ल्यू रुग्णांची तपासणी देखभाल आणि उपचारात सहभागी डॉक्टर, नर्स व इतर आरोग्य कर्मचारी यांना स्वाईन फ्ल्यू प्रतिबंधात्मक लसीचा एक डोस नवी मुंबई महापालिकेच्या तीन रुग्णालयात व २३ नागरी आरोग्य केंद्रात देण्यात येत आहे. नवी मुंबई महापालिका कार्यक्षेत्रात आत्तापर्यंत स्वाइन फ्ल्यू प्रतिबंधात्मक लसीचा डोस १४९९ लाभार्थ्यांना देण्यात आलेला आहे.**

## बाजारात पालेभाज्यांची दरवाढ

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गेले आठ दिवस राज्यभर पाऊस सुरू असल्याने मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीतील भाजीपाला बाजारात भिजलेल्या पालेभाज्यांची आवक होत आहे. या पालेभाज्या एका दिवसात खराब होत असल्याने ग्राहकांकडून मागणी कमी झाली आहे. त्यात आवकही कमी असल्याने दरात वाढ झाली आहे. दहा ते २० टक्के दर वाढले आहेत.

एपीएमसीतील भाजीपाला बाजारात दररोज ५५० ते ६०० भाजीपाला गाड्यांची आवक होत असते. ही नियमित आवक कमी होत आता ४२४ गाड्यांवर आली आहे. त्यात पावसामुळे आवक होत असलेल्या भाजीपाला हा भिजलेला येत असून तो बाजारात येईपर्यंतच खराब होत आहे. ग्राहकांनी हा भाजीपाला खरेदी केल्यानंतर त्यांना त्याच दिवशी त्याची विक्री करावी लागत आहे. शिल्लक राहिल्यास हा भाजीपाला फेकून द्यावा लागत आहे. त्यामुळे ग्राहकांकडून मागणी कमी झाली आहे. त्यामुळे दरात १० ते २० टक्केपर्यंत वाढ करावी लागल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

घाऊक बाजारात पुणे व नाशिक येथील पालेभाज्या आवक होत असून शुक्रवारी १,३९,००० क्विंटल कोथिंबीर, ३६,५०० क्विंटल मेथी तर ५२, ७०० क्विंटल पालकची आवक झाली.

**पालेभाज्या दर**

| पालेभाजी | आधी | आता |
|---|---|---|
| कोथिंबीर | २० | ३० ते ३५ |
| मेथी | १० | १५ |
| पालक | १५ | २५ |



## खारपाडा टोल माफ करावा

### आपटा ग्रामस्थांची मागणी

**रसायनी : प्रतिनिधी**

काही दिवसात आता खारपाडा पूलावर मुंबई गोवा या रोडचा टोल नाका तयार होत आहे,पण या टोलसाठी पेण व अलिबाग येथे जाताना आपटा ग्रामस्थांना टोल फ्री केला पाहिजे.कारण नियमानुसार नऊ किलोमीटर अंतरावर असलेल्या गावातील ग्रामस्थ यांना टोल फ्री असतो. म्हणून आपटा ग्रामस्थ जेव्हा जेव्हा पेण व अलिबाग येथे जाणार असतात तेव्हा टोल माफ करावा, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

नेहमीच भाजीपाला व किराणा खरेदी व जिल्ह्यातील कामासाठी अलिबाग येथे जावे लागते म्हणून ही मागणी केली जात आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम खाते यांनी याबाबत सविस्तर माहिती टोल अधिकाऱ्यांना दिली पाहिजे. म्हणजे पुढील काळात अडचणी निर्माण होणार नाहीत, असे आपटा येथील बी. एस. कुलकर्णी यांनी सांगितले.

## 'या' विभागात दोन दिवस पाणीपुरवठा राहणार बंद

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे तातडीने हाती घेण्यात आलेल्या मुख्य फिडर जलवाहिनी बदलणे आणि मुख्य फिडर जलवाहिनीवरील दुरुस्तीच्या अन्य कामांमुळे सोमवारी (दि. २२) सकाळी ९ ते मंगळवारी (दि. २३) मध्यरात्री १२ या ४० तासांच्या कालावधीत नवीन पनवेल, काळुंद्रे, कळंबोली आणि करंजाडे नोडमधली पाणी पुरवठा बंद राहणार आहे. काम पूर्ण झाल्यानंतरदेखील पुढील दोन दिवस पाणीपुरवठा कमी दाबाने होईल.

पाणी साठवण्याची योग्य ती व्यवस्था करावी व पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन सिडकोतर्फे संबंधित नोडमधील नागरिकांना करण्यात आले आहे.

## नागरी सेवाकरिता जागा राखीव

### भाजपच्या पाठपुराव्यास यश

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेने जाहीर केलेल्या डेव्हलपमेंट प्लॅन २०२२ मध्ये नेरूळ सेक्टर २ व ४ करिता खेळाचे संकुल, नागरिक समाज मंदिर आणि अग्निशमन स्टेशन जागा राखीव ठेवली असून लवकरच या कामांना गती येणार आहे. नेरूळमधील सेक्टर २आणि ४ मधील नागरिकांसाठी सदर सेवा उपलब्ध व्हावी यासाठी भाजप नवी मुंबई युवती मोर्चा अध्यक्षा सुहासिनी नायडू या मागील सहा वर्षांपासून पाठपुरावा करत होत्य.

नागरी सेवा विकास कामांना गती मिळावी यासाठी स्थानिक बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबई मनपा प्रशासनाकडे विशेष प्रयत्न केले. त्यामुळे नायडू यांनी आमदार मंदाताई म्हात्रे यांच्यासह मनपा अधिकारी जज्योती कवाडे, सोमनाथ केकन यांचे आभार मानले आहेत.

## नवी मुंबईत गणेशमूर्ती विसर्जनासाठी नियोजन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्तींना यंदा परवानगी दिल्याने या वर्षी या मूर्त्यांची संख्या ५० टक्क्यांपर्यंत असणार आहे. यामुळे पालिका प्रशासनाने या गणेश मूर्तींच्या विसर्जनासाठी कृत्रिम तलावांवर नियोजन केले असून शहरात १३५ असे तलावांचे नियोजन केले जाणार आहे.

मागील दोन वर्षांत कोरोनामुळे शहरात गणेशोत्सव साधेपणाने निर्बंध घालून साजरा करण्यात आला होता. त्यामुळे या वेळी पालिका प्रशासनाने शहरात कृत्रिम तलावांचे नियोजन केले होते. जास्तीत जास्त गणेश मूर्तींचे या ठिकाणी विसजर्न करण्यात आले होते. आता निर्बंधमुक्त गणेशोत्सव होत असून शासनाने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेश मूर्तींनाही परवानगी दिली आहे. त्यामुळे या मूर्तींची संख्या या वर्षी वाढणार आहे. या मूर्ती सार्वजनिक विसर्जन तलावात विसर्जित केल्या



तर पर्यावरणचा प्रश्न निर्माण होणार आहे. त्यामुळे प्रशासनाने मूर्ती विसर्जनासाठी सार्वजनिक तलाव व कृत्रिम तलावांचे नियोजन केले आहे. शहरात पारंपरिक २२ विसर्जन तलाव आहेत. तसेच १३४ कृत्रिम तलाव तयार करण्यात येणार आहेत. कृत्रिम तलावांत फक्त फ्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती विसर्जन करण्यात येणार आहेत. गेल्या वर्षी १५१ कृत्रिम विसर्जन स्थळांची निर्मिती करण्यात आली होती. यात वाढ करीत यावर्षी १३४ कृत्रिम तलाव निर्मिती करण्यात येणार आहेत.

### *पीओपी मूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच*


***शासनाच्या वतीने यंदा पीओपी गणेश मूर्तींना परवानगी दिली आहे, मात्र जास्तीत जास्त पर्यावरणपूरक मूर्ती असाव्यात असे सूचित करण्यात आलेले आहे. त्यामुळे यंदा ही ५० ते ४० टक्के गणेश मूर्ती पीओपीच्या असणार आहेत. त्यामुळे पर्यावरण पूरक गणेशमूर्तींचे सार्वजनिक स्थळावर विसर्जन करता येईल, परंतु पीओपी मूर्ती मात्र कृत्रिम तलावांवरच विसर्जन करण्यात येईल, अशी माहिती महापालिका प्रशासनाने दिली.***

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात 'वेबीनार'

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात व्यवसाय व्यवस्थापन शिक्षण विभाग पुणे व्यवस्थापन संघटना व नवी मुंबई व्यवस्थापन संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २०) ग्लोबल अपॉच्यूनीटीज इन डिजीटल मार्केटिंग या विषयावर आभासी व्याख्यानामध्ये आयोजन करण्यात आले.

या व्याख्यानासाठी पुणे व्यवस्थापन संघटनेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. रूपा अगवेकर या प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होत्या. या वेळी त्यांनी उपस्थितांना डिजिटल मार्केटिंगमध्ये तसेचद् डिजिटल तंत्रज्ञाम्पलृानाचा वापर व अॅव्हीएशन, डिजीटल कम्यूनिकेशन



क्रिप्टोकरन्सी, फास्टॅग, इ कॉमर्सबद्दल महत्त्वाची माहिती दिली व इदाहरण देवून स्पष्ट केले. या आभासी व्याख्यानादवारे विद्यार्थ्यांनी आपल्या शंकार्चे निरसन केले. सुमारे १०० पेक्षा अधिक विद्यार्थी या व्याख्यानासाठी उपस्थित होते.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना दिली व आजच्या युगात असलेले डिजिटल मार्केटिंगचे महत्त्व समजावून सांगितले. या वेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे आयोजन व्यवसाय व्यवस्थापन शिक्षण विभाग प्रमुख प्रा.रित ठूले यांनी केले. तसेच प्रा. रेवन शिदे, प्रा. मीरा पटेल, प्रा. धन्वी आवटे यांनी सहकार्य केले.

सुत्रसंचालन प्रा. भाग्यश्री शुक्ला यांनी केले. प्रा.अंकिता जांगिड यांनी पाहूण्यांची ओळख करून दिली. प्रा. रित ठुले यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व सचिव डॉ. एस. टी गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## 'अभिनंदन'ने फोडली सोन्याची हंडी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सानपाडा सेक्टर ८मधील हुतात्मा बाबू गेनू मैदानावर भाजप युवा नेते पांडुरंग आमले यांनी मानाची सोन्याची दहीहंडी आयोजित केली होती. ही 'सोन्याची हंडी' मुंबईतील फेरबंदर येथील अभिनंदन गोविंदा पथकाने आठ थर लावून फोडली.

भाजप नवी मुंबई महामंत्री निलेश म्हात्रे यांच्या हस्ते सव्वातीन लाख रुपये किमतीच्या मानाची हंडीचे पारितोषिक देण्यात आले. एकूण १५५ दहीहंडी पथकांनी सोन्याची हंडी फोडण्यासाठी सहभाग नोंदविला तर १५३ पथकांनी या दहीहंडीला सलामी दिली. या दहीहंडी सोहळ्यात सोन्याची हंडीव्यतिरिक्त इतरही १८ हंड्याचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवामध्ये भाजपचे नगरसेवक गिरीश म्हात्रे, यांच्यासह चिंतामणी बेल्हेकर, अशोक विधाते, रुपेश मढवी, अॅड. चंद्रकांत निकम, शेखर भोपी, जयंत म्हात्रे, रॉबिन मढवी, महेश मढवी, पंकज दळवी, सुखदेव वामन, देवनाथ म्हात्रे, घणशाम पाटे, अमोल सावंत, जया अलिम चंदानी (जया फांऊडेशन), महेश मढवी, पुण्याहून आलेले विविध मान्यवरांसह एसबीआय बँकेचे आयटी सेक्टरचे व्यवस्थापक अरविंद तेजपाल, सहाय्यक व्यवस्थापक जे.पी. चंद्रा सहभागी झाले होते. हा दहीहंडी सोहळा पाहण्यासाठी सकाळपासून रात्रीपर्यत मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

## प्रिकॉशन डोस घेणाऱ्या लकी ड्रॉ विजेत्यांचा सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रिकॉशन डोस घेण्यासाठी नागरिकांना प्रोत्साहीत करण्यासाठी कोविड लसीकरण अमृत महोत्सवात २३ जुलै २०२२ पासून ७ डी-मार्ट तसेच नेक्सेस सिवूड ग्रँड सेंट्रल मॉल व इनॉर्बिट मॉल अशा खरेदीसाठी नागरिक मोठ्या प्रमाणावर जातात अशा ९ ठिकाणी विशेष लसीकरण केंद्र सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. याठिकाणी १४ ऑगस्ट २०२२ पर्यंत प्रिकॉशन डोस घेणाऱ्या नागरिकांना कूपन देण्यात आले होते. या कूपनचा लकी ड्रॉ प्रत्येक विशेष लसीकरण केंद्रांठिकाणी १४ ऑगस्ट रोजी, सायं. ४.३० वा. उपस्थित लहान मुलांच्या हस्ते काढण्यात आला. या लकी ड्रॉ मधील प्रत्येक केंद्रावरील तीन विजेत्यांना अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट रोजी त्या त्या ठिकाणी पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.



नेक्सेस सिवूड ग्रॅंड सेंट्रल मॉल - श्रुती मढवी, शिवम तिवारी, शाहरुख गाझी. इनऑर्बिट मॉल वाशी - ऋतुजा शिंगारे, सुरज सजागणे, शिल्पा घाडी. डि मार्ट सेक्टर २१ नेरूळ - क्षितीज बापट, बजरंग राठी, जयमाल सिंग रंधवा. डि मार्ट सेक्टर ३८ सीवूड - मनस्वी धूमाळ, शशी आचार्य, निरज कुशवाह. डि मार्ट सेक्टर १० सानपाडा - दिपाली साळुंखे, चिंतामणी कारभारी, पपिया भटटाचार्य. डि मार्ट सेक्टर ७ घणसोली - वृषाली केळुसकर, राजेंद्र वाडेकर, सुजाता शिंदे. डि मार्ट सेक्टर १५ सीबीडी बेलापूर - सर्वेश सोनी, केंसरबेन पटेल, हितेश देवडा. डि मार्ट सेक्टर १० ऐरोली - सुचिता जाधव, संदिप जाधव, गायत्री सिंग. डि मार्ट सेक्टर ०७ कोपरखैरणे - सचिन जाधव, शारदा शेटटी, सागर तुपे.

प्रिकॉशन डोस घेण्यात नागरिकांना सुलभता व्हावी यादृष्टीने मागणीनुसार सोसायट्यांची कार्यालये, खाजगी रुग्णालये, जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र अशा ठिकाणी अतिरिक्त लसीकरण शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोर्बिव्हॅक्स ही लस प्रिकॉशन डोस म्हणून घेता येईल. कोर्बिव्हॅक्स या लसीला विषम कोविड १९ बुस्टर लस म्हणून मन्यता मिळाली असून ज्या १८ वर्षावरील नागरिकांनी यापूर्वी कोव्हीशिल्ड अथवा कोव्हॅक्सीन लसीचे दोन डोस घेतले असतील ते नागरिक सहा महिने किवा २६ आठवड्यानंतर कोर्बिव्हॅक्स लस प्रिकॉशन डोस म्हणून घेऊ शकतात.

कोविड लसीकरण अमृत महोत्सव ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत साजरा केला जात असून महानगरपालिकेची सर्व रुग्णालये व प्राथमिक आरोग्य केंद्रे या ठिकाणी जाऊन १८ ते ५९ वयोगटातील अथवा त्यापुढील वयाच्या नागरिकांनी आपला प्रिकॉशन डोस विनामूल्य घेऊन स्वत:ला लस संरक्षित करून घ्यावे असे आवाहन महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

रामप्रहर

श्रावणधारा

## यंदाचा श्रावण राजकारणात रमला

श्रावणाचा पाऊस या वर्षी
राजकारणात रमला
सत्ता बदलुन इतिहास घडविला
खूप खूप बरसला झीम्मा फुगडी खेळला
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
थाटात साजरा केला
या वर्षी श्रावण भाग्यदायी झाला
घराघरावर तिरंगा
अभिमानाने फडकला
श्रावण तसा सर्वांचाच असतो
महिलांचा सहभागत
त्यात मोठा असतो
लोभसवाणी इंद्रधनुची माळ झुले
वैभव बघण्या शिवाराचे आनंदाने मन डुले
यंदाचा श्रावण राजकारणात रमला
सत्ता बदलुन इतिहास घडविला



-धनंजय गोंधळी
(चिरनेर-उरण)

# पाली बसस्थानक नूतनीकरणाचा मार्ग मोकळा

## नवीन निविदा काढण्याची प्रक्रिया सुरू

**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्याचे मुख्यालय असलेल्या पाली येथील एसटी बसस्थानकाचे नूतनीकरण दोन वर्षांपासून रखडले आहे. दरम्यान, नवीन निविदा काढण्याची प्रक्रिया सुरू झाल्याने पाली बसस्थानकाच्या नूतनीकणाचा मार्ग मोकळा झाला आहे. पालीतील एसटी बस स्थानकाची मोडकळीस आलेली जुनी इमारत तोडून एक वर्ष उलटून गेले तरीदेखील नवीन इमारत अजूनही बांधण्यात आलेली नाही.

ठेकेदाराने काम पूर्णपणे थांबविल्यामुळे या स्थानकाची प्रचंड दूरवस्था झाली असून स्थानकाला





विविध समस्यांनी ग्रासले आहे. या बसस्थानकाचे नूतनीकरण व विविध समस्यांसंदर्भात सामाजिक कार्यकर्ते रवींद्रनाथ ओव्हाळ हे परिवहन महामंडळाकडे पाठपुरावा करत आहेत.

मागील महिन्यात राज्य परिवहन महामंडळाच्या मुंबई प्रदेश कार्यकारी अभियंता विद्या भिलारकर आणि रायगड विभाग नियंत्रक अनघा बारटक्के यांनी पाली बस स्थानकाची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यावेळी जुन्या ठेकेदाराला हटवून नवीन निविदा काढणार असल्याचे त्यांनी सांगितले होते. त्यानुसार नवीन निविदा काढण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, असे भिलारकर यांनी सांगितले.

> **पाली बस स्थानक नुतनीकरणाचा जुना ठेका रद्द करण्यात आला असून, नवीन निविदा काढण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पुढील वर्षी जानेवारी महिन्यात प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. निधीदेखील वाढविण्यात येणार आहे. मात्र आराखडा तोच राहणार आहे.**
> **–विद्या भिलारकर, कार्यकारी अभियंता, राज्य परिवहन महामंडळ– मुंबई प्रदेश**

'ऑपरेशन अनामत' अभियानात रोहा रेल्वे पोलिसांची कामगिरी

# गाडीत हरवलेला मोबाइल प्रवाशाच्या स्वाधीन

**रोहे : प्रतिनिधी**

दिवा–सावंतवाडी रेल्वे गाडीतून गुरुवारी (दि. १९) रोहा स्थानकावर उतरलेल्या एका महिला प्रवाशाचा मोबाइल गाडीत विसरला होता. 'ऑपरेशन अनामत' अभियानातून रेल्वे पोलिसांनी हा हरवलेला मोबाइल माणगाव स्थानकात ताब्यात घेऊन तो संबंधित महिला प्रवाशाच्या स्वाधीन केला.

दिवा स्थानकावरुन सावंतवाडीकडे जाणाऱ्या रेल्वे गाडीतून गुरुवारी अश्विनी गोविंद कर्जेकर या रोहे स्थानकात उतरल्या. गाडी रोहा स्थानकातून पुढे रवाना झाल्यानंतर मोबाईल गाडीमध्येच राहिला असल्याचे अश्विनी यांच्या लक्षात आले. ही गोष्ट त्यांनी रोहा स्थानकात कर्तव्यावर असलेल्या उपनिरिक्षक मोतीलाल मीना, जवान विकास कुमार, शिवाजी पाटील यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यांनी त्वरित माणगाव रेल्वे स्थानकाशी संपर्क करून हरवलेला मोबाइल तपासण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार माणगाव रेल्वे स्थानकावरील कर्मचाऱ्यांना तो हरवलेला मोबाईल सापडला. तो त्यांनी खातरजमा करून अश्विनी कर्जेकर यांच्या स्वाधीन केला.

# विनायक मेटे यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी भरून येणार नाही –विनोद साबळे

**कर्जत : प्रतिनिधी**

आपण समाजाचे देणे लागतो, यापद्धतीने विनायक मेटे यांनी मराठा समाज म्हणजेच माझे कुटुंब अशा प्रकारे काम सुरू केले. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली मराठा समाजाची पोकळी भरून येणार नाही, असे प्रतिपादन मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक विनोद साबळे यांनी शनिवारी (दि. २०) कर्जत येथे केले.

शिवसंग्रामचे नेते विनायक मेटे यांचे नुकताच अपघाती निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी कर्जतमधील रॉयल गार्डनच्या सभागृहात शनिवारी शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. मराठा समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते शंकर थोरवे यांनी दीप प्रज्वलन केले. मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक विनोद साबळे यांनी मेटे यांना श्रद्धांजली अर्पण केली.

विनायक मेटे यांनी मराठा समाजासाठी केलेले काम आपण





(छाया : विजय मांडे)

विसरू शकत नाही. त्यांच्यामुळे मराठा समाजाच्या आंदोलनाला योग्य दिशा मिळाली होती. त्यांच्या जाण्याने मराठा समाजावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे, असे कर्जतचे माजी नगराध्यक्ष राजेश लाड सांगितले. अनिल भोसले यांनी, मराठा एकटविण्यासाठी मेटेसाहेब प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात स्वतः फिरले. त्यांच्या जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे, असे सांगितले.

माजी सरपंच मधुकर घारे म्हणाले की, स्व. आण्णासाहेब पाटील यांच्यानंतर मेटे यांनी मराठा समाजासाठी मोठे काम केले आहे. त्यांनी अनेक मोर्चे, आंदोलने केली या मोर्चाला नेहमीच विक्रमी गर्दी होत होती. त्यांच्या जाण्याने मराठा समाज पोरका झाल्यासारखा वाटतो.

रायगड जिल्ह्यातील मराठा समाजाला एकत्र करण्याचे काम विनायक मेटे यांनी केले. त्यांनी सर्वांना सोबत घेऊन चळवळ उभी केली. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभे रहावे, यासाठी ते प्रयत्नशील होते, असे खोपोलीचे माजी नगराध्यक्ष सुनील पाटील यांनी सांगितले.

मेटे यांनी मराठा समाजासाठी दिलेल्या योगदानाचा मी साक्षीदार आहे. त्यांच्या जाण्याने मराठा समाजाची हानी झाली आहे, असे शंकर थोरवे यांनी सांगितले. किरण ठाकरे, अ‍ॅड. पूजा सुर्वे, अ‍ॅड. गोपाळ शेळके, अरुण देशमुख, संतोष पेरणे, अक्षय तिखंडे यांनीही मनोगत व्यक्त केले.रामेश्वर मेटे, रत्नाकर बडेकर, बजरंग श्रीखंडे, ज्ञानेश्वर भालिवडे, डॉ. ज्ञानेश्वर साबणे, कृष्णा घाडगे, प्रकाश पालकर, भगवान घरत, बंडू तुरडे, नंदकुमार शिर्के, प्रफुल्ल देशमुख, कैलास म्हामले, अरुण थोरवे यांच्यासह मराठा बांधव या शोकसभेला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केमिकलयुक्त पाण्यामुळे बाळगंगा नदी दूषित

## खालापूर तालुक्यातील अनेक पाणी योजना अडचणीत, ग्रामस्थ आक्रमक

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायत हद्दीमधील उत्तम स्टील कारखान्यातून केमिकल युक्त लालसर पाणी नाल्यातून सोडल्यामुळे बाळगंगा नदी दूषित झाली आहे. नदीच्या पाण्यावर पंधराहून अधिक ग्रामपंचयतीच्या पाणी योजना अवलंबून असल्याने दूषित पाण्यामुळे ५० गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे परिसरातील ग्रामस्थ आक्रमक झाले आहेत. प्रशासकीय यंत्रणेने पंचनामा करून प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कोकण भवन येथील अधिकाऱ्यांना पाचारण केले आहे.

पोलाद उत्पादन करणारी उत्तम स्टील ही सर्वात मोठी कंपनी खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायत हद्दीत असून, या कंपनीत उत्पादन काढण्यासाठी केमिकलचा वापर केला जातो. यातील टाकाऊ केमिकलयुक्त दूषित लालसर पाणी नाल्यावाटे बाळगंगा नदीमध्ये गेल्याने नदीचे पाणी लालसर झाले आहे. या नदीच्या पाण्यावर १० ते १५ गावांच्या पाणी योजना आहेत. त्यामुळे तांबाटी



> **कारखान्याच्या उत्पादन प्रक्रियेनंतर सांडपाणी साठवण टाकीत ठेवले जाते, मात्र ही टाकी पूर्ण भरल्यानंतर सांडपाणी नाल्यावाटे नदीपात्रात गेल्याची तक्रार नागरिकांची आहे. हे सांडपाणी थांबवून नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासंदर्भात मार्ग काढण्यात येईल.**
> **–सुमित आहुजा, वरिष्ठ व्यवस्थापक, उत्तम स्टील, तांबाटी, ता. खालापूर**

सरपंच अनिल जाधव, जांभिवलीचे सरपंच दिनेश घाडगे, तसेच नितीन कदम, राकेश लाड मनसे कार्यकर्ते महेश सोगे, आशिष कोंडे, अविनाश कदम मोहन घाडगे, सुधीर दळवी, संतोष पाटील यांच्यासह ग्रामस्थ आक्रमक झाल्याने तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या आदेशाने वावोशीचे मंडळ अधिकारी तुषार कामत यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी माधव कावरखे व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला. तसेच तीन ठिकाणचे पाण्याचे नमुने घेऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी किल्लेदार यांना कळविण्यात आले. त्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे फिल्ड ऑफिसर अरविंद धपाटे यांनी घटनास्थळी भेट दिली.

# राजिपच्या वतीने स्वप्नातील गावे, स्वदेश फाउंडेशनचा सन्मान

**अलिबाग : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वदेश फाउंडेशनच्या सहकार्याने रायगड जिल्ह्यामध्ये ७५ स्वदेस स्वप्नातील गावे बनवण्यात आली आहेत. त्यामधील उत्कृष्ट काम करणाऱ्या १४ गावांचा तसेच स्वप्नातील गावांना घडवण्यासाठी मदत करणाऱ्या स्वदेश फाउंडेशनचा रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते नुकताच अलिबाग येथे सन्मान करण्यात आला.

सुधागड तालुक्यामधील आपटवणे ग्रामपंचायतीमधील भावशेत ठाकूरवाडी व तिवरे ग्रामपंचायतीमधील कानसळ, श्रीवर्धन तालुक्यामधील वाळवटी ग्रामपंचायतमधील बौद्धवाडी व रोहिदासवाडी आणि नागलोली ग्रामपंचायतीमधील नागलोली, म्हसळा तालुक्यामधील पाभरे ग्रामपंचायतीमधील चाफेवाडी व खामगाव ग्रामपंचायतीमधील खामगाववाडी, तळा तालुक्यामधील



निगुडशेत ग्रामपंचायतीमधील सोलमवाडी व सोनसडे ग्रामपंचायतीमधील वावे हवेली, माणगाव तालुक्यामधील खरवली ग्रामपंचायतीमधील चेरवली व वडगांव ग्रामपंचायतीमधील वडघर, पोलादपूर तालुक्यामधील वझारवाडी ग्रामपंचायतीमधील देऊळवाडी व गोळेगणी ग्रामपंचायतीमधील येरूणकरवाडी, महाड तालुक्यामधील कुंभार्डे ग्रामपंचायतीमधील गव्हाडी व लाडवली ग्रामपंचायतीमधील बेटकरकोंड येथील गाव विकास समिती सदस्य, सरपंच व ग्रामसेवक तसेच स्वदेश फाउंडेशनच्या वतीने उपसंचालक तुषार इनामदार व महाव्यवस्थापक प्रसाद पाटील यांनी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते सन्मान स्वीकारला.

सन्मानप्राप्त १४ गावांच्या गाव विकास समिती, सरपंच व ग्रामसेवक यांचे अभिनंदन करून डॉ. किरण पाटील यांनी, जिल्ह्यामध्ये अनेक स्वप्नातील गावे लवकरात लवकर तयार होतील, अशी अशा व्यक्त केली तसेच स्वदेश फाउंडेशन रायगड जिल्ह्यामध्ये करीत असलेल्या ग्रामीण सक्षमीकरण कार्याचे कौतुक केले. स्वदेश फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंगेश वांगे यांनीही सन्मानप्राप्त १४ गावांच्या गाव विकास समिती, सरपंच व ग्रामसेवक यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या नेहा जाधव यांनी केले. जिल्हा परिषद सामान्य प्रशासन उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, महिला व बालविकास उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक, पाणी व स्वच्छता विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले, कृषी विकास अधिकारी लक्ष्मण खुरखुटे, पशु संवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम, माध्यमिक शिक्षण विभाग अधिकारी ज्योत्स्ना शिंदे–पवार प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनीता गुरव, वित्त अधिकारी भगवान घाडगे, गटविकास अधिकारी विजय यादव, भाऊसाहेब पोळ व बालाजी पुरी यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी कर्मचारी व विविध गावातील ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

# खोपोलीत काशी होम्स दहीहंडी महोत्सवाचा मानकरी सोमजाई मंडळ

**खोपोली : प्रतिनिधी**

सोमजाई मित्र मंडळाच्या गोविंदा पथकाने खोपोली शहरातील बहुचर्चित काशी होम्स दहीहंडी फोडून रोख एक लाख ११ हजार व मानाचा चषक पटकावला. विजेत्या गोविंदा पथकाला काशी होमचे विक्रम साबळे, यशवंत साबळे आणि माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर यांच्या हस्ते रोख पारितोषिक व चषक प्रदान करण्यात आला.

खोपोली शास्त्रीनगर गुरुद्वारा येथे काशी होम तर्फे शुक्रवारी दहीहंडी उभारण्यात आली होती. यावर्षी शिंदे, फडणवीस सरकारने गोविंदा पथकांना विमा कवच देण्याची घोषणा केल्याने तर गोविंदा पथकांमध्ये अधिक उत्साह संचारला होता. खालापूरचा साबईमाता मित्र मंडळ, खालची खोपोली येथील शिवशक्ती मंडळ, वरची खोपोली येथील वीरेश्वर मंडळ व सोमजाई माता मित्र मंडळ यांच्या गोविंदा पथकांनी काशी होम्स दहीहंडी महोत्सवात हजेरी लावून



पाच थरांची सलामी दिली. सलामी देणाऱ्या गोविंदा पथकांनाही रोख पारितोषिक देण्यात आली. या दहीहंडी महोत्सवाला आमदार महेंद्र थोरवे, माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, डॉ. सुनील पाटील, माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, माजी नगरसेवक सूर्यकांत देशमुख, माजी नगरसेविका जिनी सॅम्युअल, माधवी रिटे, नगर परिषदेचे प्रशासक अनुप दुरे, खालापुरच्या माजी नगराध्यक्ष शिवानी जंगम, केटीएसपी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम, कार्यावाह किशोर पाटील, संचालक दिलीप पोरवाल, अबू जळगावकर, तसेच अतुल पाटील, प्रशांत कोठावळे, राजू गायकवाड, रॉबिन सॅम्यूअल, सुहास वझरकर, नईम मुक्री, ईश्वर शिंपी, चंद्राप्पा अनिवार, संतोष मालकर, रमेश मोगरे, अ‍ॅड. राजेंद्र येरुणकर यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, उद्योजक, विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

दहावी व बारावी परीक्षेत खोपोली प्रथम आलेल्यांचा तसेच सामाजिक कार्यकर्ते अतिकभाई खोत, यशवंती हायकर्सचे सगळगिळे, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त मारुती आडकर यांना आमदार थोरवे यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन या वेळी सन्मानित करण्यात आले.


काशी होम्स दहीहंडी फोडण्याचा मान सोमजाई मित्र मंडळाच्या गोविंदा पथकाने पटकावला. या गोविंदा पथकास, रोख एक लाख ११ हजार व काशी होम चषक देण्यात आला.

# पालीमध्ये वरवठणे गोविंदा पथकाने फोडली दहीहंडी

**पाली : प्रतिनिधी**

शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपने पाली येथे उभारलेली लाखमोलाची दहीहंडी फोडण्याचा मान वरवठणे येथील श्री चौडेश्वरी माता गोविंदा पथकांने पटकाविला. शुक्रवारी रात्री सात थर लावून या गोविंदा पथकाने ही मानाची दहीहंडी फोडून उपस्थितांची मने जिंकली.

सुधागड तालुक्यातील पालीमध्ये शुक्रवारी शिवसेना (शिंदे गट) व भाजप पुरस्कृत एक लाख ११ हजार १११ रुपये व आकर्षक चषक असलेली दहीहंडी उभारण्यात आली होती. आमदार रविशेठ पाटील व आमदार महेंद्र दळवी या ठिकाणी गोविंदा पथकाना शुभेच्छा दिल्या. उंच क्रेनला बांधलेली ही दहीहंडी कोण फोडणार? दहीहंडीची उंची कमी करावी लागेल का ?



(छाया : धम्मशील सावंत)

### सात थर लावून जिंकली उपस्थितांची मने

ही हंडी फोडण्यासाठी किती थर लावावे लागतील, याची उत्सुकता लागून राहिली होती. रायगड जिल्ह्यातून आलेल्या अनेक गोविंदा पथकांनी ही लाखमोलाची दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न केला. शेवटी वरवठणे येथील श्री चौडेश्वरी माता गोविंदा पथकांने सात थर लावून ही मानाची दहीहंडी फोडली.

शिवसेना (शिंदे गट) सुधागड तालुका प्रमुख रवींद्र देशमुख, उपजिल्हाप्रमुख अनुपम कुलकर्णी, भाजप जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, तालुका अध्यक्ष चंद्रकांत घोसाळकर, तसेच भरत पाटील, सुभाष पाटील, सिराज पानसरे, किशोर म्हात्रे, राजेंद्र गांधी, संतोष लाड, प्रशांत शेठ, प्रकाश ठोंबरे, हिराकांत भगत, किशोर जोशी, शिरीष सकपाळ, अजय खंडागळे, शिवसेना (शिंदे गट) युवा सेना जिल्हाप्रमुख संजय म्हात्रे, संदीप दपके, मंगेश पालांडे, शिवराम पवार, सतीश देशमुख, धनंजय पांडव, मनोज भोईर, निखिल शहा, अविनाश शिंदे, संदेश सोनकर, मंगेश खंडागळे, उमेश मढवी, महेश खंडागळे, किरण खंडागळे, ललित ठोंबरे आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते आणि दहीहंडी प्रेमी नागरिक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माणगावात दहीहंडी उत्सव उत्साहात

## गोविंदा पथकांवर बक्षिसांची खैरात; सहा–सात थरांपर्यंत सलामी

**माणगाव : प्रतिनिधी**

आमदार भरतशेठ गोगावले मित्रमंडळ आयोजित माणगावात तालुका शिवसेने (शिंदे गट) चा दहीहंडी उत्सव शुक्रवारी (दि.१९) पंचायत समिती कार्यालय परिसरात उत्साहात साजरा झाला. या दहीहंडी उत्सवात रायगड जिल्ह्यातील अनेक गोविंद पथकांनी भाग घेऊन लाखो रुपयांच्या बक्षिसांची लयलूट केली.

आमदार भरत गोगावले, शिवसेना (शिंदे गट) जिल्हा संपर्कप्रमुख अरुण चाळके, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर यांनी उत्सवाला उपस्थित राहून गोविंदा पथके व नागरिकांना शुभेच्छा दिल्या. या दहीहंडी उत्सवात चार थरापासून पुढे सलामी देणाऱ्या गोविंदा पथकांवर बक्षिसांची खैरात



(छाया : सलीम शेख)

करण्यात आली. माणगाव, महाड, नाते, रोहा, खोपोली, देवकान्हे, धाटाव येथील सुमारे २५ गोविंदा पथकांनी उपस्थिती दाखवून सहा ते सात थरांपर्यंत सलामी देऊन रोख रकमांची बक्षिसे पटकाविली. खांदाड येथील सोनभैरव गोविंदा पथकाने सात थरांची सलामी देऊन उपस्थितांकडून वाहवा मिळविली.

शिवसेना (शिंदे गट) नेते अ‍ॅड. राजीव साबळे, तालुकाप्रमुख अ‍ॅड. महेंद्र मानकर, शहरप्रमुख सुनील पवार, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले, नगरपंचायतीच्या महिला व बालकल्याण सभापती शर्मिला सुर्वे यांच्यासह पदाधिकारी, शिवसैनिक व दहीहंडी प्रेमी नागरिक या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारत–झिम्बॉब्वे वनडे मालिका

# भारताची विजयी आघाडी

**हरारे : वृत्तसंस्था**

भारताने झिम्बॉब्वेचे १६२ धावांचे आव्हान पाच फलंदाजांच्या मोबदल्यात पार करीत दुसरा वनडे सामना जिंकला. झिम्बॉब्वेने भारताचे चार बाद ९७ धावा अशी चांगली झुंज दिली होती, मात्र संजू सॅमसन आणि दीपक हुड्डा (२५) यांनी पाचव्या विकेटसाठी ५६ धावांची भागीदारी रचून भारताला विजयापर्यंत पोहचवले.



भारताकडून शिखर धवन आणि शुभमन गिलने प्रत्येकी ३३ धावा केल्या, तर शार्दुल ठाकूरने ३८ धावा देत तीन बळी घेतले. भारताने तीन वनडे सामन्यांच्या मालिकेत २–० अशी विजयी आघाडी घेतली आहे. आता तिसरा सामना २२ ऑगस्टला होणार आहे.

१६२ धावांचे आव्हान पार करताना सुरुवातीला भारताची टॉप ऑर्डर ढेपाळली होती. सलामीला आलेला कर्णधार केएल राहुल (६) दुसऱ्याच षटकात बाद झाला. त्यानंतर शिखर धवन आणि शुभमन गिल यांनी दुसऱ्या विकेटसाठी ४२ भागीदारी रचली, मात्र शिखर धवन ३३ धावा करून माघारी गेला. भारताचा सलामीवीर इशान किशन दुसऱ्या वनडे सामन्यात मधल्या फळीत फलंदाजी करण्यास आला, मात्र तो फक्त सहा धावांची भर घालून माघारी परतला. त्याला जाँगवेने बाद केले. त्यानंतर शुभमन गिल देखील ३३ धावांवर बाद झाला. या दोघांनीही लुक लाँगवेने बाद केले.

यानंतर संजू सॅमसन आणि दीपक हुड्डा यांनी पाचव्या विकेटसाठी ५६ धावांची भागीदारी रचली. संजू सॅमसनने नाबाद धावा केल्या तर दीपक हुड्डाने २५ धावा केल्या. या दोघांनी भारताला विजयाच्या समिप पोहचवले. त्यानंतर संजू सॅसमन आणि अक्षर पटेल यांनी विजयाची औपचारिकता २६ षटकात पार पाडली. संजू सॅमसनने नाबाद ३९ धावा केल्या.

तत्पूर्वी, दुसऱ्या सामन्यात भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारतीय गोलंदाजांनी झिम्बाब्वेला ३८.१ षटकांत १६१ धावात गुंडाळले. शार्दुल ठाकूरने भेदक मारा करीत तीन विकेट्स घेतल्या. तर झिम्बॉब्वेने सेन विलियम्सने ४२ धावांची झुंजार खेळी केली. त्याला रेयान ब्लरने ३९ धावा करून चांगली साथ दिली. भारताने झिम्बॉब्वेचा डाव १६१ धावात संपुष्टात आणला. भारताकडून शार्दुल ठाकूरने ३८ धावा देत तीन तर प्रसिद्ध कृष्णा, मोहम्मद सिराज, कुलदीप यादव, दीपक हुड्डा आणि अक्षर पटेलने प्रत्येकी एक विकेट घेतली. झिम्बॉब्वेचे शेवटचे दोन फलंदाज धावबाद झाले.

## इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय महिला संघ जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाची शुक्रवारी घोषणा करण्यात आली. १० सप्टेंबरपासून खेळवण्यात येणाऱ्या इंग्लंडविरुद्धच्या टी–२० व एकदिवसीय मालिकेसाठी ही निवड करण्यात आली आहे. भारत–इंग्लंड यांच्यामध्ये तीन टी–२० व तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका होणार आहे. दोन्ही संघांच्या नेतृत्वपदी हरमनप्रपीत कौर हिला कायम ठेवण्यात आले असून स्मृती मानधना हीदेखील उपकर्णधारपदी कायम आहे. सध्या नागालँडमधून खेळणारी महाराष्ट्राची खेळाडू केपी नवगिरे हिला भारतीय संघामध्ये संधी देण्यात आली आहे.



भारताचा महिला क्रिकेट संघ १० सप्टेंबरपासून इंग्लंडविरुद्ध तीन टी–२० व तीन एकदिवसीय लढती खेळणार आहे. या मालिकेसाठी तिची संघात निवड करण्यात आली आहे.

टी–२० संघ : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, दीप्ती शर्मा, पूजा वस्त्रकार, जेमिमा रॉड्रिग्स, स्नेह राणा, रेणुका ठाकूर, मेघना सिंग, राधा यादव, सबीनेनी मेघना, तानिया भाटिया (यष्टीरक्षक), राजेश्वरी गायकवाड, दयालन हेमलता, सिमरन बहादूर, रिचा घोष, केपी नवगिरे.

एकदिवसीय संघ : हरमनप्रीत कौर (कर्णधार), स्मृती मानधना (उपकर्णधार), शफाली वर्मा, दिप्ती शर्मा, पूजा वस्त्रकार, जेमिमा रॉड्रिग्स, स्नेह राणा, रेणुका ठाकूर, मेघना सिंग, सबीनेनी मेघना, तानिया भाटिया (यष्टीरक्षक), राजेश्वरी गायकवाड, दयालन हेमलता, सिमरन बहादूर, यास्तिका भाटिया, हर्लीन देओल, झुलन गोस्वामी.

## अंकुर, इच्छाशक्ती, बाबुराव चांदेरे फाउंडेशनची कबड्डी स्पर्धेत विजयी सलामी

**पुणे : प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील जुन्नर, वडगांव–सहाणी येथील वायूकुमार मंडळाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत स्थानिक पुरुष गटात अंकुर, इच्छाशक्ती, बाबुराव चांदेरे फाउंडेशनने विजयी सलामी दिली, तर राकेशभाऊ घुले, छावा यांनी गटातील दोन्ही सामने जिंकत बाद फेरीतील आपला प्रवेश निश्चित केला.



पुणे येथील शरदचंद्र पवार क्रीडासंकुलातील मॅटवर झालेल्या उद्घाटनीय सामन्यात मुंबई शहरच्या गोलफादेवीने अ गटात बीडच्या शारदा प्रतिष्ठानला ३४–३४ असे बरोबरीत रोखले. मध्यांतराला तीन गुणांनी पिछाडीवर पडलेल्या गोलफादेवीने तुषार, विष्णू लाड, विष्णू हरमळकर यांच्या उत्तरार्धातील चमकदार खेळाच्या जोरावर किमया साधली. मुंबई शहरच्या अंकुरने ब गटात सांगलीच्या जय मातृभूमीचा ५२–२८ असा धुव्वा उडविला. इ गटात पालघरच्या इच्छाशक्तीने अहमदनगरच्या आझाद मंडळाचा २७–१८ असा सहज पाडाव केला. पहिल्या डावात १५–०७ अशी आघाडी घेणाऱ्या इच्छाशक्तीने दुसऱ्या डावात सावध खेळ करीत हा विजय साकारला. यश ठोंबरे, साहिल कदम, प्रेम मंडल इच्छाशक्तीकडून, तर आकाश रणनवरे, प्रथमेश जाधव आझाद मंडळाकडून उत्कृष्ट खेळले.

अ गटात नांदेडच्या बाबुराव चांदेरे फाउंडेशनने चुरशीच्या लढतीत बीडच्या शारदा प्रतिष्ठानचा २५–२३ असा पराभव करीत विजयी सुरुवात केली. मध्यांतराला चार गुणांनी पिछाडीवर पडलेल्या चांदेरे फाउंडेशनला आयुब पठाण, किरण मगर यांच्या चतुरस्त्र खेळाने विजय मिळवून दिला. शारदा प्रतिष्ठानच्या संदेश देशमुख, आकाश राठोड यांचा खेळ उत्तरार्धात कमी पडला. ड गटात कोल्हापूरच्या छावा मंडळाने दोन विजय मिळवीत आरामात बाद फेरी गाठली. प्रथम त्यांनी मुंबई शहरच्या स्वस्तिकचा ४९–२९, तर दुसऱ्या सामन्यात ठाण्याच्या उजाळा मंडळाचा ३०–२३ असा पराभव केला.

ब गटात पुण्याच्या राकेशभाऊ घुले संघाने प्रथम रायगडच्या मिडलाईन स्पोर्ट्सचा ४५–२७ असा, तर नंतर कोल्हापूरच्या शाहू स्पोर्ट्सचा ३१–२६ असा पाडाव करीत साखळीत दोन्ही विजय मिळविले. या दोन्ही विजयाने त्यांनी या स्पर्धेच्या बाद फेरीत प्रवेश केला. विशाल ताटे, पवन कुऱ्हाडे, गौरव तापकिरे, हर्षद भेखे यांच्या चढाई पकडीच्या खेळाला या विजयाचे श्रेय जाते.

## मनिषा कल्याण यूईएफए खेळणारी ठरली पहिली भारतीय महिला फुटबॉलपटू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची युवा स्ट्रायकर मनिषा कल्याण यूईएफए महिला चॅम्पियन्स लीग खेळणारी पहिली भारतीय महिला फुटबॉलपटू ठरली आहे. तिने अपोलोन लेडीज फुटबॉल क्लबकडून एनगोमी साप्रस येथे सुरू असलेल्या युरोपियन क्लब स्पर्धेत पदार्पण केले. कल्याणने माकारियो स्टेडियममधील सामन्यात सायप्रसच्या मारिलेना जॉर्जियोसला ६०व्या मिनिटाला रिप्लेस केले. अपोलोन लेडिज फुटबॉल क्लबने एसएफके रिगाचा ३–० असा पराभव केला. हा यूडब्ल्यूसीएलचा सलामीचा सामना होता.



२० वर्षांची मनिषा कल्याण ही विदेशी क्लबकडून करारबद्ध होणारी चौथी भारतीय आंतरराष्ट्रीय फुटबॉलपटू आहे. मनिषाने राष्ट्रीय संघाकडून आणि इंडियन वुमन्स लीग स्पर्धेत गोकुलम केरला संघाकडून खेळताना दमदार कामगिरी केली होती. तिला नुकताच ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशनचा महिला फुटबॉलर ऑफ द इयर २०२१–२२ पुरस्कार मिळाला आहे. मनिषा वर्ल्डकप उपविजेत्या ब्राझील संघाविरूद्ध गोल केल्यानंतर प्रकाशझोतात आली होती.

मनिषा ही गोकुलम केरलाची विदेशी क्लबकडून खेळणारी दुसरी खेळाडू ठरली आहे. यापूर्वी दांगमेई ग्रेस उझबेकिस्तानच्या नासाफ फुटबॉल क्लबकडून खेळली आहे.

## पंजाब किंग्जही प्रशिक्षक बदलणार?

**चंदिगड : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये टीम पंजाब किंग्स आता नवीन मुख्य प्रशिक्षकाच्या शोधात आहे. संघाचे विद्यमान मुख्य प्रशिक्षक अनिल कुंबळे यांचा करार संपत असताना फ्रँचायझी त्यांच्यासोबत करार पुढे करणार नसल्याचे वृत्त आहे. अलिकडेच कोलकाता नाइट रायडर्सने ब्रेंडन मॅक्क्युलमच्या जागी चंद्रकांत पंडित यांची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली आहे. आता पंजाब किंग्ससुद्धा मोठा बदल करताना दिसू शकते.

पंजाब किंग्जच्या संघाला आजपर्यंत आयपीएलचे एकही विजेतेपद जिंकता आलेले नाही. इतकेच नाही तर २०१४च्या आयपीएलपासून हा संघ प्लेऑफमध्येही पोहचलेला नाही. आयपीएल २०१४मध्ये पंजाब किंग्जचा संघ अंतिम फेरीत पोहचला आणि उपविजेता ठरला. हीच त्यांची आयपीएल इतिहासातील सर्वोत्तम कामगिरी आहे.


अनिल कुंबळेच्या प्रशिक्षणाखाली पंजाब संघाने ४२पैकी केवळ १९ सामने जिंकले आहेत. एका सूत्राने सांगितले की, पंजाब किंग्सने अनिल कुंबळेसोबतचा तीन वर्षांचा करार न वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. या कराराची मुदत या वर्षी सप्टेंबरमध्ये संपत आहे. पंजाब किंग्जच्या अधिकाऱ्यांनी पुढील एक–दोन आठवड्यात निर्णय घेणार असल्याचे सांगितले आहे.

## गौतम गंभीर खेळणार लिजेंड्स लीग क्रिकेट

**मुंबई : प्रतिनिधी**

सप्टेंबर महिना हा क्रिकेट चाहत्यांना ९०च्या दशकात पुन्हा घेऊन जाणारा ठरणार आहे. सौरव गांगुली, वीरेंद्र सेहवाग, हरभजन सिंग आदी भारताचे माजी स्टार खेळाडू लिजेंड्स लीग क्रिकेटच्या निमित्ताने पुन्हा मैदानावर उतरणार आहेत. त्यात आता भारताचा आणखी एका वर्ल्डकप विजेत्या खेळाडूची एण्ट्री झाली आहे.

१६ सप्टेंबरला इंडियन महाराजा आणि वर्ल्ड जायंट्स यांच्यात भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने विशेष सामना खेळवला जाणार आहे. १७ सप्टेंबरपासून लीगला सुरुवात होतेय. इंडियन महाराजा संघाचे कर्णधारपद सौरव गांगुली करतोय, तर वर्ल्ड जायंट्सचे नेतृत्व इयॉन मॉर्गनकडे आहे. आतापर्यंत १० देशांतील खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. चार संघांचा या लीगमध्ये सहभाग असून एकूण १५ सामने होणार आहेत.



भारताचा माजी सलामीवीर आणि कर्णधार गौतम गंभीर या लीगच्या दुसऱ्या पर्वात खेळणार आहे. २००७चा ट्वेंटी–२० वर्ल्डकप व २०११च्या वनडे वर्ल्डकप विजेत्या संघातील गंभीर हा महत्त्वाचा खेळाडू ठरला होता. २०११च्या वनडे वर्ल्डकप फायलनमधील त्याच्या ९७ धावांच्या खेळीने भारताला २८ वर्षांनंतर वर्ल्डकप जिंकून देण्यात सिंहाचा वाटा उचलला होता. याशिवाय इंडियन प्रीमिअर लीगमध्ये कोलकाता नाइट रायडर्सला त्याने २०१२ व २०१४मध्ये जेतेपद जिंकून दिले आहे.

इंडियन महाराजा संघ : सौरव गांगुल (कर्णधार), वीरेंद्र सेहवाग, मोहम्मद कैफ, युसूफ पठाण, एस. बद्रीनाथ, इरफान पठाण, पार्थिव पटेल, स्टुअर्ट बिन्नी, एस. श्रीसंथ, हरभजन सिंग, नमन ओझा, अशोक दिंडा, प्रग्यान ओझा, अजय जडेजा, आर. पी. सिंग, जोगिंदर सिंग, रितिंदर सिंग सोढी

रेस्ट ऑफ वर्ल्ड : इयॉन मॉर्गन (कर्णधार), लेंडल सिमन्स, हर्षल गिब्स, जॅक कॅलिस, सनथ जयसूर्या, मॅट प्रायर, नॅथन मॅक्यलम, जाँटी ऱ्होड्स, मुथय्या मुरलीधरन, डेल स्टेन, हॅमिल्टन मसकात्झा, मश्रफे मोर्ताझा, असघर अफघान, मिचेल जॉन्सन, ब्रेट लीग, केव्हिन ओब्रायन, दिनेश रामदीन.

## भारतीय फुटबॉल महासंघाच्या अध्यक्षपदासाठी भुतियाचा अर्ज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा माजी फुटबॉल कर्णधार बायच्युंग भुतियाने अखिल भारतीय फुटबॉल महासंघाच्या (एआयएफएफ) निवडणुकीत थेट अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला.



भुतियाने अर्ज केला असला तरी या पदासाठी सध्या आणखी एक माजी फुटबॉलपटू कल्याण चौबे यांचे पारडे जड मानले जात आहे. भुतियाच्या नावाला त्याचा संघसहकारी दीपक मोंडलने प्रस्तावित केले आणि मधू कुमारीने अनुमोदन दिले. सर्वोच्च न्यायालयाने नव्याने खेळाडूंना निवडणूक प्रक्रियेत सामावून घेण्याचा आदेश दिला आहे. त्यानुसार मी खेळाडूंचा प्रतिनिधी म्हणून अर्ज दाखल केला आहे. संघटक म्हणूनही खेळाडू चांगले काम करू शकतात हे आम्हाला दाखवून द्यायचे आहे, असे भुतिया म्हणाला.

भारतातील श्री गोकुळम केरळ एफसी आणि एटीके मोहन बागान या क्लबच्या संघांना अखिल भारतीय फुटबॉल महासंघावरील बंदीनंतरही 'एएफसी' स्पर्धेत खेळू द्यावे, अशी विनंती क्रीडा मंत्रालयाने 'फिफा' आणि आशियाई फुटबॉल महासंघाला (एएफसी) केली.



**पनवेल : भारत विकास परिषद नेरूळ खारघर शाखेतर्फे आयोजित समूहगीत गायन स्पर्धेत खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल यांनी हिंदी व मराठी समूहगीतात प्रथम पारितोषिक मिळविले. त्याबद्दल या स्पर्धेत संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी अन्या पटेल, किमया राऊत, अपूर्व ठाकूर, पंकज मोकल, तीर्थ हांडे, यशिता बडेकर, यशिका चव्हाण, भार्गवी सावंत, श्रीशा पुल्लीवार या विद्यार्थ्यांचे व संगीत शिक्षक दत्तात्रय मोकल व मधुकर धोंगडे यांचे अभिनंदन केले.**



**अलिबाग : तालुका व शहर भाजपच्या वतीने शुक्रवारी एक लाख ५१ हजारांची दहीहंडी प्रायोजित केली होती. ही दहीहंडी मरुआई मेटपाडा गोविंदा पथकाने फोडली. त्यांना भाजप जिल्हा सरचिटणीसश्री मिलिंद पाटील, भाजप लोकसभा संयोजक सोपान जांभेकर, अलिबाग शहराध्यक्ष अंकित बंगेरा आदींच्या हस्ते गौरविण्यात आले.**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com